कर्नाटक सरकार

# मराठी सरिता

## तृतीय भाषा पाठ्यपुस्तक
## Marathi Third Language

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

# 9

## इयत्ता नववी

### भाग - 1

**Karnataka Textbook Society (R.)**
6th Cross, Malleshwaram, Bengaluru - 560 003.

# ಮುನ್ನುಡಿ

2005ನೇ ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಪಠ್ಯಕ್ರಮದ ಆಧಾರದ ಮೇಲೆ ರಚಿತವಾದ ಕರ್ನಾಟಕ ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯವಸ್ತುವಿನ ಆಧಾರದ ಮೇಲೆ ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘವು 2010ನೇ ಸಾಲಿನಿಂದ ಒಂದನೇ ತರಗತಿಯಿಂದ ಹತ್ತನೇತರಗತಿವರೆಗಿನ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ರಚನಾ ಕಾರ್ಯದಲ್ಲಿ ತೊಡಗಿದೆ. ಒಟ್ಟು ಹನ್ನೊಂದು ಭಾಷಾ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಹಾಗೂ ಕೋರ್ ವಿಷಯಗಳನ್ನು 7 ಮಾಧ್ಯಮಗಳಲ್ಲಿ ರಚನೆ ಮಾಡಲಾಗುತ್ತಿದೆ. 1 ರಿಂದ 4ನೇ ತರಗತಿಯವರೆಗೆ ಪರಿಸರ ವಿಜ್ಞಾನ ಮತ್ತು 5ರಿಂದ 10ನೇ ತರಗತಿಯವರೆಗೆ ಕೋರ್ ವಿಷಯಗಳಾದ ಗಣಿತ, ವಿಜ್ಞಾನ ಮತ್ತು ಸಮಾಜ ವಿಜ್ಞಾನ ವಿಷಯಗಳಿರುತ್ತವೆ.

**2005ರ ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕವು ಈ ಕೆಳಗಿನ ವೈಶಿಷ್ಟ್ಯಗಳನ್ನು ಹೊಂದಿದೆ.**

- ಕಲಿಕೆಯನ್ನು ಜೀವನದ ಅವಶ್ಯಕತೆಗಳಿಗೆ ಜೋಡಿಸುವುದು.
- ಕಂಠಪಾಠ ವಿಧಾನದಿಂದ ಕಲಿಕೆಯನ್ನು ಮುಕ್ತಗೊಳಿಸುವುದು.
- ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಹೊರತಾಗಿ ಪಠ್ಯಕ್ರಮವನ್ನು ಶ್ರೀಮಂತಗೊಳಿಸುವುದು.
- ಜ್ಞಾನದ ಅಭಿವೃದ್ಧಿಗೆ ಕಲಿಕಾ ಅನುಭವಗಳನ್ನು ಬಳಸುವುದು.
- ಭಾರತದ ಪ್ರಜಾಸತ್ತಾತ್ಮಕ ನೀತಿಯನ್ವಯ ಮಕ್ಕಳ ಅವಶ್ಯಕತೆಗಳಿಗೆ ತಕ್ಕಂತೆ ಸ್ಪಂದಿಸುವುದು.
- ಶಿಕ್ಷಣವನ್ನು ಇಂದಿನ ಹಾಗೂ ಭವಿಷ್ಯದ ಜೀವನಾವಶ್ಯಕತೆಗಳಿಗೆ ಹೊಂದುವಂತೆ ಮಾಡುವುದು.
- ವಿಷಯಗಳ ಮೇರೆಗಳನ್ನು ಮುರಿದು ಅವುಗಳ ಸಮಗ್ರದೃಷ್ಟಿಯ ಬೋಧನೆಯನ್ನು ಅಳವಡಿಸುವುದು.
- ಶಾಲೆಯ ಹೊರಗಿನ ಬದುಕಿಗೆ ಜ್ಞಾನ ಸಂಯೋಜನೆ.
- ಮಕ್ಕಳಿಂದಲೇ ಜ್ಞಾನವನ್ನು ಅಭಿವೃದ್ಧಿ ಪಡಿಸುವುದು.

**ನೂತನ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಕೆಳಗಿನ ಮೂಲಭೂತ ವಿಧಾನಗಳ ಆಧಾರದ ಮೇಲೆ ರಚಿಸಲಾಗಿದೆ.**

- ಅಂತರ್ಗತ ವಿಧಾನ (Intergrated Approach),
- ರಚನಾತ್ಮಕ ವಿಧಾನ (Constructive Approach),
- ಸುರುಳಿಯಾಕಾರದ ವಿಧಾನ (Spiral Approach),

ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ವಿಷಯ ಹಾಗೂ ಅಭ್ಯಾಸಗಳು ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳನ್ನು ಯೋಚನೆ ಮಾಡುವಂತೆ ಮಾಡಿ, ಚಟುವಟಿಕೆಗಳ ಮೂಲಕ ಜ್ಞಾನ ಹಾಗೂ ಸಾಮರ್ಥ್ಯಗಳನ್ನು ಪಡೆಯುವಂತೆ ಮಾಡುವ ಪ್ರಯತ್ನ ಮಾಡಲಾಗಿದೆ. ಪಠ್ಯವಸ್ತುಗಳೊಂದಿಗೆ ಅತ್ಯಂತ ಅವಶ್ಯಕ ಭಾರತೀಯ ಜೀವನ ಮೌಲ್ಯಗಳನ್ನು ಅಂತರ್ಗತವಾಗಿ ಬಳಸಲಾಗಿದೆ. ಈ ನೂತನ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳು ಪರೀಕ್ಷಾಪೂರಕ ದೃಷ್ಟಿಯಿಂದ ರಚಿತವಾಗಿಲ್ಲ. ಬದಲಾಗಿ ಅವುಗಳು ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳ ಸರ್ವಾಂಗೀಣ ವ್ಯಕ್ತಿತ್ವ ವಿಕಸನಕ್ಕೆ ಪೂರಕವಾಗಿವೆ. ತನ್ಮೂಲಕ ಅವರನ್ನು ಸ್ವತಂತ್ರ ಭಾರತದ ಸ್ವಸ್ಥ ಸಮಾಜದ ಉತ್ತಮ ಪ್ರಜೆಗಳನ್ನಾಗಿ ಮಾಡುವ ಪ್ರಯತ್ನ ನಡೆದಿದೆ.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

ಭಾಷಾಕಲಿಕೆಯಲ್ಲಿ ಅತ್ಯಂತ ಮುಖ್ಯ ಗುರಿಗಳಾದ ಆಲಿಸುವುದು, ಮಾತನಾಡುವುದು, ಓದುವುದು, ಬರೆಯುವುದು ಹಾಗೂ ಆಕರಗ್ರಂಥಗಳಿಂದ ವಿಷಯ ಸಂಗ್ರಹಣೆಯಂತಹ ಕ್ಷೇತ್ರವಾರು ಸಾಮರ್ಥ್ಯಗಳಿಗೆ ಒತ್ತು ನೀಡಲಾಗಿದೆ. ಈ ಕೌಶಲ್ಯಗಳೊಂದಿಗೆ ಕ್ರಿಯಾತ್ಮಕ ವ್ಯಾಕರಣ, ಸೌಂದರ್ಯಪ್ರಜ್ಞೆ, ಪ್ರಶಂಸಾ ಮನೋಭಾವ, ಮೌಲ್ಯಗಳ ಸಂವರ್ಧನೆ ಹಾಗೂ ಮಕ್ಕಳ ಅಭ್ಯಾಸ ಪುಸ್ತಕಗಳಲ್ಲಿ ಅನೇಕ ಚಟುವಟಿಕೆಗಳನ್ನು ಮಕ್ಕಳಿಂದ ಮಾಡಿಸಿ ಅವರಲ್ಲಿ ಸಂಬಂಧಪಟ್ಟ ಸಾಮಥ್ಯ ಸಂವರ್ಧನೆಗೆ ಅನುವು ಮಾಡಿಕೊಡಬೇಕು. ಈ ಸಾಮರ್ಥ್ಯ ಮಕ್ಕಳಲ್ಲಿ ಬಂದಾಗ ಅವರು ಪರೀಕ್ಷೆಗಳಿಗಾಗಿ ಕಂಠಪಾಠಕ್ಕೆ ಶರಣು ಹೋಗಬೇಕಾಗಿಲ್ಲ. ಪಠ್ಯಪುಸ್ತಕವು ಭಾಷಾ ಕೌಶಲ್ಯಗಳ ಸಂವರ್ಧನೆಗೆ ಒಂದು ಪೂರಕವಸ್ತುವೆಂದು ಪರಿಗಣಿಸಲು, ಮಕ್ಕಳ ಮನೋವೈಶಾಲ್ಯವನ್ನು ಬೆಳೆಸಲು ವಿಷಯಗಳಿಗೆ ಸಂಬಂಧಿಸಿದಂತೆ ಅನೇಕ ಚಟುವಟಿಕೆಗಳನ್ನು ಪಠ್ಯಪುಸ್ತಕದಲ್ಲಿ ಒದಗಿಸಲಾಗಿದೆ. ಮಿತ್ರರೊಂದಿಗೆ ಗುಂಪುಗಳಲ್ಲಿ ಚರ್ಚೆಯ ಮೂಲಕ ಅವರ ಅಭಿವ್ಯಕ್ತಿ ಹಾಗೂ ಸಂವಹನ ಕೌಶಲ್ಯಗಳ ಸಂವರ್ಧನೆಯೇ ಕಲಿಕೆ ಗುರಿಯೆಂದು ಅಂತಹ ಚಟುವಟಿಕೆಗಳಿಗೆ ಹೆಚ್ಚಿನ ಪ್ರಾಮುಖ್ಯತೆಯನ್ನು ನೀಡಲಾಗಿದೆ. ಈ ರೀತಿಯ ಚಟುವಟಿಕೆಗಳು ಮಕ್ಕಳಲ್ಲಿ ಕಲಿಯುವ ಕಲೆ (learning to learning) ಹಾಗೂ ಕಲಿತುದುದನ್ನು ಜೀವನದಲ್ಲಿ ಅಳವಡಿಸುವ ಶಕ್ತಿ (learning to do), ಯನ್ನು ಮಕ್ಕಳಲ್ಲಿ ವೃದ್ಧಿಮಾಡುತ್ತದೆ. ಪ್ರತಿ ಘಟಕದಲ್ಲಿಯೂ ಕೆಲವು ಜೀವನ ಮೌಲ್ಯಗಳನ್ನು ಅಂತರ್ಗತವಾಗಿ ಜೋಡಿಸಲಾಗಿದೆ.

ಬೆಳಗಾವಿ ಹಾಗೂ ಕಲಬುರಗಿ ವಿಭಾಗದ ಸ್ಥಳೀಯರ, ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳ, ಪೋಷಕರ ಆಸಕ್ತಿ ಹಾಗೂ ಅಪೇಕ್ಷೆಯ ಮೇರೆಗೆ 2023ನೇ ಶೈಕ್ಷಣಿಕ ಸಾಲಿನಿಂದ ಮರಾಠಿ ಭಾಷೆಯನ್ನು ತೃತೀಯ ಭಾಷೆಯಾಗಿ ಕಲಿಸುವ ಉದ್ದೇಶದಿಂದ 8ನೇ ತರಗತಿ ಮರಾಠಿ–ಸರಿತ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕವನ್ನು ನೂತನವಾಗಿ ರಚಿಸಿ ಮುದ್ರಿಸಲಾಗಿದೆ. ಇದರ ಸಂಪೂರ್ಣ ಪ್ರಯೋಜನವನ್ನು ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳು ಹಾಗೂ ಭಾಷಾಸಕ್ತರು ಪಡೆಯುವರೆಂಬ ವಿಶ್ವಾಸವನ್ನು ಸಂಘವು ಹೊಂದಿದೆ.

ಈ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕದ ರಚನೆಯಲ್ಲಿ ಸಹಕರಿಸಿದ ಸಮಿತಿಯ ಅಧ್ಯಕ್ಷರಿಗೆ, ಸದಸ್ಯರಿಗೆ, ಕಲಾವಿದರಿಗೆ, ಪರಿಶೀಲಕರಿಗೆ, ಸಂಪಾದಕ ಮಂಡಳಿಯ ಸದಸ್ಯರುಗಳಿಗೆ ಮತ್ತು ಜಿಲ್ಲಾ ಶಿಕ್ಷಣ ಮತ್ತು ತರಬೇತಿ ಸಂಸ್ಥೆ, ಬೆಳಗಾವಿರವರಿಗೆ, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘವು ಹೃತ್ಪೂರ್ವಕ ಕೃತಜ್ಞತೆಗಳನ್ನು ಸಲ್ಲಿಸುತ್ತದೆ. ಈ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕವನ್ನು ಇನ್ನಷ್ಟು ಉತ್ತಮಗೊಳಿಸುವ ನಿಟ್ಟಿನಲ್ಲಿ ರಚನಾತ್ಮಕ ಸಲಹೆಗಳನ್ನು ಸಂಘವು ಹೃತ್ಪೂರ್ವಕವಾಗಿ ಸ್ವಾಗತಿಸುತ್ತದೆ.

**ಶ್ರೀ ಎಂ.ಪಿ. ಮಾದೇಗೌಡ**
ವ್ಯವಸ್ಥಾಪಕ ನಿರ್ದೇಶಕರು
ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ.)
ಬೆಂಗಳೂರು.

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

# Foreword

In the pursuit of fostering a healthier and more balanced educational journey, we present this initiative aimed at reducing the weight of school bags. Education is the cornerstone of progress and it is our responsibility to ensure that the pursuit of knowledge is accompanied by the wellbeing of students.

As a first step, to reduce the burden of heavy bags, the School Education Department, Government of Karnataka has decided to print semester-wise textbooks in 2 parts i.e., Summative Assessment 1 and 2. This intervention will help significantly in reducing the weight of school bags.

This Endeavour signifies a paradigm shift, acknowledging the strain posed by bulky bags on students.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**Manjushree. N. IAS**
Managing Director
Karnataka Textbook Society (R.)

# मनोगत

नववी मराठी तृतीय भाषा पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना  आम्हाला मनापासून आनंद होत आहे. आपल्याला हे पाठ्यपुस्तक आवडेल असा विश्वास आहे.

इयत्ता नववीसाठी तृतीय भाषा मराठीचे "मराठी सरिता "हे पाठ्यपुस्तक तयार करताना राष्ट्रीय अभ्यासक्रमाची  चौकट (NCF) 2005 मधील मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन हे पाठ्यपुस्तक तयार केले आहे".

इयत्ता नववीच्या वर्गातील विद्यार्थ्यांची  बौद्धिक, मानसिक पातळी व भाषिक क्षमता याचा विचार करून गद्य, पद्य व व्याकरणाची निवड करण्यात आली आहे. वाचन, लेखन, श्रवण व भाषण या चार भाषिक कौशल्यांचा विकास व्हावा याचा प्रामुख्याने या पाठ्यपुस्तकात विचार करण्यात आला आहे. तसेच आपले विचार भावभावना व्यक्तींसमोर योग्य प्रकारे आणि प्रभावीपणे मांडता याव्यात, लेखन करण्यासाठी भाषेवर प्रभुत्व वाढावे व भाषेचा विविध प्रकारे वापर करता येईल याचाही विचार पाठ्यपुस्तकात केलेला आहे. त्यानुसार भाषाभ्यास व स्वाध्याय देण्यात आला आहे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकडे प्रामुख्याने जाणीवपूर्वक लक्ष दिले आहे. विद्यार्थ्यांच्यात नैतिक मूल्यांचे संस्कार व्हावेत या हेतूने त्या स्वरूपाचे पाठ व कविता घेतल्या आहेत. अहिंसा, सत्य, जिद्द, त्याग, आनंद, निसर्ग प्रेम, भाषा प्रेम, संघर्ष अशा स्वरूपाची मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये  विकसित व्हावी, संस्कारसंपन्न विद्यार्थी घडावा हा उद्देश ठेवून पुस्तकाची रचना केलेली आहे.

विद्यार्थ्यांना कर्नाटकातील समृद्ध ऐतिहासिक परंपरा, संस्कृती यांची ओळख  व्हावी, मराठी भाषा, साहित्य, संस्कृती, बोलीभाषा या सर्वांचा परिचय व्हावा व त्यांच्यामध्ये भाषिक जाण निर्माण व्हावी; स्वयंअध्ययन करावे या हेतूने तशा स्वरूपाचा स्वाध्याय देण्यात आला आहे. विविध शब्दकोडी, भाषिक खेळ व विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळावा या हेतूने गद्य, पद्य, व्याकरण व पूरक वाचन यांचा समावेश केला आहे.  या पाठ्यपुस्तक निर्मितीसाठी सरकारी शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे (सीटीई) प्राचार्य एम. एम. सिंधुर, सहनिर्देशक वॉल्टर एच. डिमेलो, प्राचार्य एस. डी. गांजी, डायेट, मण्णूर, बेळगावी, प्रभारी प्राचार्य वाय. जे. बजंत्री, समन्वय अधिकारी प्रा. भारती दासोग, डायेट, मण्णूर, बेळगावी या सर्वांचे बहुमोल मार्गदर्शन व सहकार्य लाभले त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

# TEXT BOOK COMMITTEE

**Shri Suresh Vasantrao Patil**
Chairman, Lecturer in Marathi, Jyoti Pre University College, Belagavi.

**Members:**

**1. Kalpana S. Rayjadhav**
Assistant Teacher, D. S. Nadage Composite P.U. College, Karadga, Belagavi.

**2. Smt. Asmita Atul Deshpande**
Assistant Teacher, Mahila Vidyalaya High School, Belagavi.

**3. Deepak Dattatray Jadhav**
Government Marathi High School, RMSA, Gunji Tq. Khanapur, Dist. Belgavi.

**4. Gajanand Ashok Naik**
Akol High School, Akol, Tq.Nipani, Dist. Belagavi.

**Scrutinizer:**

**Ranjit Laxman Chaugule**
Asst. Teacher, Govt. Sardars High School, Belagavi.

**Artist:**

**B.S. Gasti**
Drawing Teacher, Government Marathi High School RMSA Gunji Tq. Khanapur, Dist. Belagavi.

**Editorial Board Members:**

**Dr. Vinod Gaikwad**
Rtd. Professor, Dept. of Marathi, R.C.U. Belagavi.

**Dr. Manisha Nesarkar**
Professor, Dept. of Marathi, R.C.U. Belagavi.

**Co-ordination:**

**Shri S. D. Ganji**
Principal, DDPI (Devp.), DIET, Mannur, Belagavi.

**Smt. Bharati Bheemarayappa Dasog**
Lecturer, DIET, Belagavi.

**Chief Advisors :**

**Sri M. P. Madegowda,**
Managing Director, Karnataka Textbook Society (R.) Bengaluru.

**Smt M. D. Usha,**
Deputy Director, Karnataka Textbook Society (R.), Bengaluru.

**Programme Co-ordinator :**

**Sri. L. Shankare Gowda**
Assistant Director, Karnataka Textbook Society (R.), Bengaluru.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

Y2R8C5

# अनुक्रमणिक

## गद्यविभाग


| अ.क्र. | पाठाचे नाव | लेखकाचे नाव | साहित्य प्रकार | मूल्य | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | लीळाचरित्र – अहिंसावृत्ती | म्हाइंभट | प्राचीन गद्य | अहिंसा | 01 |
| 2 | शाळेचे दिवस | महात्मा गांधी | आत्मकथन | सत्य, प्रामाणिकपणा | 04 |
| 3 | आऊ | वि. द. घाटे | व्यक्तिचित्रण | जिद्द, शिक्षणप्रेम | 09 |
| 4 | दोन मेघ | वि . स. खांडेकर | रूपक कथा | त्याग, कृतज्ञता | 14 |
| 5 | हंपीचे कलावैभव | गंगाधर गाडगीळ | प्रवासवर्णन | संस्कृतीबद्दलआदर | 19 |


## पद्यविभाग


| अ.क्र. | कवितेचे नाव | कविचे नाव | साहित्य प्रकार | मूल्य | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | हीन याती माझी देवा<br>संत कृपा झाली | संत चोखामेळा<br>संत बहिणाबाई | अभंग<br>अभंग | भक्ती<br>आर्तता | 26 |
| 2 | घडयाळ | केशवसुत | रूपांतरित काव्य | वेळेचे महत्व | 34 |
| 3 | शाळा | केशवकुमार | प्रार्थना गीत | एकता | 39 |
| 4 | किती तरी दिवसात | बा. सी. मर्ढेकर | नव काव्य | आत्मचिंतन | 44 |
| 5 | गवतफुला रे ! गवतफुला ! | इंदिरा संत | निसर्गकविता | निसर्ग प्रेम | 48 |


## पूरक वाचन


| अ.क्र. | कवितेचे नाव | कविचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1 | वळणं येत गेली .. .. .. | नारायण सुर्वे | 52 |
| 2 | खरा दागिना | सुधा मूर्ती | 55 |


## व्याकरण


| | | | |
|---|---|---|---|
| 1 | अलंकार | | 59 |
| 2 | पत्रलेखन, ई मेल | | 62 |
| 3 | प्रयोग | | 69 |
| 4 | समास | | 71 |


@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# 1 लीळाचरित्र : अहिंसावृत्ती

म्हाइंभट

S3N5U9

म्हाइंभट (सुमारे इ.स. 1230 ते 1300) इसवी सनाच्या बाराव्या शतकात महानुभाव पंथ या नावाचा एक भक्तिपंथ उत्तर महाराष्ट्रात उदयाला आला होता. श्री. चक्रधर हे या पंथाचे संस्थापक होते. म्हाइंभट या त्यांच्या शिष्याने, 'लीळाचरित्र' या नावाचे श्रीचक्रधरांचे चरित्र लिहिले असून हाच मराठीतील पहिला चरित्रग्रंथ मानला जातो. या ठिकाणी श्री. चक्रधरस्वामींच्या स्वभावाचे विशेष दाखविणारी एक छोटी लीळा निवडली आहे.

प्राचीन मराठी वाङ्मयातील गद्याचा एक नमुना या दृष्टीने 'लीळाचरित्राचे' महत्त्व मोठे आहे.

(मूल्य : अहिंसा)

## अहिंसावृत्ती



गावी एकी वृक्षाखालि आसन: तव पारधी वाटे ससा सीडीला : तेया पाठी सुणी सोडीली : काकूळती येउनि ससा जानूतळि रीगाला : सूणी उभी राहिली : मागील कडौनि पारधी आले : तेही वीनविले : ससा सोडीजो जी : सर्वज्ञे म्हणीतले : हा एथ सरण आला : पुडती तीही म्हणीतले : जी जी हा होडेचा ससा जी : हां सोडावा: जी : सर्वज्ञे म्हणीतले: हां गा : एथ सरण आलेया काइ मरण असे : हां गा : ए. रानी असति: पाणी

NOT TO BE PUBLISHED

पीति : याते तुम्ही कां मारा : तींहीं म्हणीतलें जी जी: आजि लागौनि न मरूं : मग : ते निघाले : मग : सर्वज्ञे म्हणीतले : माहात्मे हो : आतां जाए ऐसें : भणौनि : जानु उचलिली : मग ससा निगाला ||

**शब्दार्थ :** सुणी - कुत्री, जानूतळि - मांडीखाली, रीगाला - गेला, सर्वज्ञ - श्री चक्रधरस्वामी, होडेचा - पैजेचा, महात्मे हो - सशाला गंमतीने महात्मा म्हटले आहे.

### लीळेचा भावार्थ:

चक्रधर एका गावात झाडाखाली आसन घालून बसले होते. तेव्हा पारध्यांनी वाटेत ससा पाहिला. पारध्यांनी सशाच्या पाठीमागे कुत्री सोडली. ससा आपले प्राण वाचविण्यासाठी व्याकुळतेने चक्रधरांच्या मांडीखाली जाऊन बसला.चक्रधरांच्या समोर पारध्यांची कुत्री उभी राहिली. थोडयावेळाने पारधीही आले. त्यांनी विनंती केली “सशाला सोडा जी” सर्वज्ञ (चक्रधर) म्हणाले, “हा ससा येथे शरण आला आहे.” तेवढयात पारधी म्हणाले, “जी जी हा पैजेचा ससा आहे. सोडावा” सर्वज्ञ म्हणाले, “हा ससा येथे शरण आला आहे. शरण आलेल्याला काही मरण नसते. हा ससा जंगलात राहतो, तेथील पाणी पितो. या सशाला काही कारण नसताना तुम्ही का मारता?” पारधी म्हणाले, “जी जी आजपासून प्राण्यांची हिंसा करणार नाही.” आणि ते निघून गेले मग सर्वज्ञ म्हणाले, "माहात्मे (ससा) हो, आता निघून जावे" असे म्हणून त्यांनी आपली मांडीवर केली, मग ससा जंगलाच्या दिशेने निघून गेला.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

### I) खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.

1. चक्रधर कोठे बसले होते?
2. पारध्यांनी रस्त्यात काय पाहिले ?
3. ससा कोठे जाऊन बसला ?
4. पारध्यांनी सशाच्या पाठीमागे कोणाला सोडले?
5. ‘माहात्मे’ हा शब्द कोणाला उद्देशून म्हटला आहे?

### II) खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

1. चक्रधरांनी सशाला पारध्याकडे का दिले नाही ?
2. पारध्यांचे मन परिवर्तन कोणी व कसे केले?
3. चक्रधरांनी या लीळेतून काय सांगितले आहे?

## III) खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

1. चक्रधरस्वामी यांच्या स्वभावाचे गुणविशेष लिहा.
2. या लीळेचा भावार्थ तुमच्या शब्दात लिहा.

## IV) ससंदर्भ स्पष्ट करा.

1. हा एथ सरण आला.
2. एथ सरण आलेया काइ मरण असे
3. आजि लागौनि न मरु

## V) आजच्या प्रमाण मराठीत वाक्य लिहा.

1. मागील कडौनि पारधी आले.
2. जी जी हा होडेचा ससा जी
3. माहात्मे हो आता जाए ऐसे

## उपक्रम :-

1. नाटयरूपात ही कथा वर्गात सादर करा.
2. महानुभावपंथांचे दृष्टांत मिळवून वाचा.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

2

# शाळेचे दिवस

महात्मा गांधी

X8R2G3



महात्मा गांधी (1869-1948) पूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी. भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील प्रमुख नेते आणि तत्त्वज्ञ होते. ते एक वकील, वसाहतविरोधी राष्ट्रवादी नेतेआणि राजकीय नैतिकतावादी होते.जगभरातील अनेक नागरी हक्क आणि स्वातंत्र्य चळवळींना महात्मा गांधींकडून प्रेरणा मिळाली.

महात्मा गांधी यांनी हायस्कूल मध्ये असताना आलेले अनुभव येथे चित्रित केले आहेत. 'माझे सत्याचे प्रयोग' या आत्मचरित्रातून हा भाग संपादित करून घेतला आहे.

**(मूल्य : सत्य, प्रामाणिकपणा)**

माझे लग्न झाले तेव्हा मी हायस्कूलमध्ये शिकत होतो. आम्ही तिघे भाऊ एकाच शाळेत शिकत होतो. मोठा भाऊ वरील इयत्तेत होता आणि माझ्या बरोबरच लग्न झालेला भाऊ माझ्यापेक्षा फक्त एक वर्ष पुढे होता. लग्नामुळे आम्हा दोघा भावांचे एक वर्ष वाया गेले.

माझा अभ्यास चालूच होता. हायस्कुलात माझी गणना 'ढ' विद्यार्थ्यांत होत नसे. शिक्षकांची मर्जी तर मी नेहमीच संपादीत असे. प्रत्येक वर्षी आईबापांना विद्यार्थ्यांचा अभ्यास व वर्तन यासंबंधी प्रमाणपत्रे पाठविली जात. त्यामध्ये कधीही माझा अभ्यास किंवा वर्तन खराब असल्याबद्दल टीका नव्हती. दुसऱ्या इयत्तेनंतर बक्षीसेही मिळविली व पाचव्या-सहाव्या इयत्तेत अनुक्रमे चार व दहा रुपयांची शिष्यवृत्तीही मिळविली. ती मिळविण्यात माझ्या हुशारीपेक्षा दैवाचाच भाग विशेष होता. कारण ही शिष्यवृत्ती सर्व विद्यार्थ्यांसाठी नव्हती तर जे काठियावाडच्या सौराष्ट्र-प्रांतातले विद्यार्थी असतील, त्यांत पहिला येणाऱ्याला होती. चाळीस-पन्नास विद्यार्थ्यांच्या वर्गात त्या दिवसांत सौराष्ट्र-प्रांताचे विद्यार्थी फारसे नसायचे.

मला आठवते की मला माझ्या हुशारीबद्दल अभिमान मुळीच नव्हता. बक्षिस किंवा शिष्यवृत्ती मिळाली तर मला आश्चर्य वाटत असे. परंतु माझ्या वर्तनाला मी फार जपत असे. वर्तनात उणीव निघाली तर मला रडू येई. शिक्षकांना मला बोलावे लागेल अशा तऱ्हेने माझ्या हातून काहीही घडले किंवा शिक्षकांना तसे वाटणे ही गोष्ट मला असह्य होत असे. एक वेळ मार खावा लागला असे मला स्मरते. माराचे दुःख नव्हते. परंतु मी शिक्षेला पात्र ठरलो याचे महादुःख वाटले. मी खूप रडलो. हा प्रसंग पहिल्या किंवा दुसऱ्या इयत्तेतील आहे. दुसरा प्रसंग सातव्या इयत्तेतील आहे. त्यावेळी दोराबजी एदलजी गिमी हेडमास्तर होते. ते विद्यार्थीप्रिय होते. कारण, ते नियम पाळीत, पद्धतशीर काम करीत, करवीत व शिकवीतही चांगले. त्यांनी वरच्या इयत्तांच्या

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

विद्यार्थ्यांस कवायत व क्रिकेट अनिवार्य केले होते. मला दोन्हीचा कंटाळा होता. ते सक्तीचे करण्यापूर्वी मी कोणत्याही कवायत, क्रिकेट किंवा फुटबॉलमध्ये भाग घेतला नव्हता. माझा भिडस्त स्वभाव हेही न जाण्याचे एक कारण होते. आता मला दिसते, की हा कंटाळा चुकीचा होता. कवायतीचा शिक्षणाशी संबंध नाही, अशी चुकीची समजूत माझी त्यावेळी होती. मागून मी समजलो, की व्यायामाला म्हणजे शारीरिक शिक्षणाला मानसिक शिक्षणाच्या बरोबरीचे स्थान विद्यार्जनात असले पाहिजे.

तरीही कवायतीस न गेल्यामुळे माझे नुकसान झालेले नाही, हेही मला नमूद केले पाहिजे. त्याचे कारण मोकळ्या हवेत फिरण्याचे फायदे मी पुस्तकात वाचले होतेआणि हा सल्ला आवडल्याने मला चालण्याची सवय लागली होती, जी ती शेवटपर्यंत राहिली. फिरणे हाही व्यायाम आहेच. त्यामुळे माझे शरीर काही अंशी कसलेले बनले.

कंटाळ्याचे दुसरे कारण म्हणजे माझ्या वडिलांची सेवा करण्याची माझी तीव्र इच्छा. शाळा बंद होताच, मी घाईघाईने घरी जायचो आणि त्यांची सेवा करायला लागायचो. सक्तीची कवायत (व्यायाम) थेट या सेवेच्या मार्गात आला.वडिलांची सेवा करण्यासाठी कवायतीची माफी मिळाली पाहिजे अशी विनंती केली. परंतु गिमीसाहेब कसली माफी देतात ? एका शनिवारी सकाळची शाळा होती. आणि चार वाजता घरून शाळेत कवायतीला जायचे होते. माझ्यापाशी घडयाळ नव्हते. आकाशात ढग असल्यामुळे वेळ समजली नाही. ढगांमुळे मी फसलो. कवायतीला जातो तो सर्व निघूनही गेले होते. दुसऱ्या दिवशी गिमीसाहेबांनी हजेरी तपासली. तीत मी गैरहजर निघालो. मला कारण विचारले. मी जे होते ते सांगितले. त्यांनी ते खरे मानले नाही आणि मला एक की दोन आणे (किती ते बरोबर आठवत नाही) दंड झाला.

मला खोटे बोलल्याबद्दल दोषी ठरवले गेले! त्यामुळे मला खूप वेदना झाल्या. मी माझे निर्दोषत्व कसे सिद्ध करू? मार्ग सुचेना. मनातल्या मनात फुणफुणत राहिलो, रडलो, ठरवले की सत्य बोलणाऱ्याने व सत्य आचरणाऱ्याने गाफीलही राहता कामा नये. शाळेतील माझ्या निष्काळजीपणाचा हा पहिला आणि शेवटचा प्रसंग होता. मला पुसट आठवण आहे, की मी तो दंड माफ करण्यात यशस्वी झालो. कवायतीतून मोकळीक तर मिळविलीच. शाळेच्या वेळेनंतर स्वतःच्या सेवेसाठी आपल्याला माझी जरूरत असते, असे वडिलांचे पत्र हेडमास्तरांना दिल्यामुळे मोकळीक मिळाली.

चुकीबद्दल मला कदाचित शिक्षा भोगावी लागली नाही; परंतु दुसऱ्या एका चुकीची शिक्षा मी आजपर्यंत भोगीत आहे. शिक्षणामध्ये हस्ताक्षर चांगले लिहिण्याची जरूरी नाही, असा चुकीचा समज माझ्यामध्ये कोठून आला ते माहीत नाही; परंतु तो थेट विलायतेला जाईपर्यंत राहिला. मागाहून आणि मुख्यतः दक्षिण आफ्रिकेमध्ये तेथील वकिलांची व आफ्रिकेत जन्मलेल्या नवयुवकांची मोत्यासारखी हस्ताक्षरे पाहिली, तेव्हा मी शरमलो व पस्तावलो. माझ्या ध्यानात आले, की खराब अक्षर ही अर्धवट शिक्षणाची निशाणी समजली पाहिजे. मी मागून माझे अक्षर- सुधारण्याचा खूप प्रयत्न केला, परंतु पक्क्या मडक्याचे काठ वळणार थोडेच ? बालवयामध्ये

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

ज्याची मी हेळसांड केली, ते मी आजपर्यंत करू शकलो नाही. दर एक नवयुवक व नवयुवती यांनी माझ्या उदाहरणावरून सावध व्हावे आणि ध्यानात धरावे की चांगले अक्षर हे विद्येचे आवश्यक अंग आहे. चांगले अक्षर शिकण्यासाठी रेखाकला आवश्यक आहे. माझे तर असे मत बनले आहे की मुलांना रेखाकला अगोदर शिकवावी. ज्याप्रमाणे पक्षी, वस्तू वगैरे पाहून बालक त्यांचे स्मरण ठेवून सहजी ओळखू शकते, त्याप्रमाणेच अक्षरे प्रथम ओळखण्यास शिकावे व रेखाकला शिकून चित्रे वगैरे काढण्यास शिकल्यानंतर अक्षरे काढण्यास शिकले, तर त्याचे अक्षर छापलेल्या अक्षराप्रमाणे येईल.

विद्याभ्यासासंबंधी आणखी दोन आठवणी नमूद करण्या सारख्या आहेत. विवाहामुळे एक वर्ष फुकट गेले ते भरून काढण्याचा दुसऱ्या इयत्तेत मास्तरांनी माझ्याकडून बेत करविला. मेहनती विद्यार्थ्यांना तसे करण्याची परवानगी त्यावेळी तरी मिळत असे. म्हणून मी तिसऱ्या इयत्तेत सहा महिने बसलो व उन्हाळयाच्या सुटीपूर्वीच्या परीक्षेनंतर मला चौथीत घातले. येथपासून काही शिक्षण इंग्रजीतून होऊ लागते. मला काही समजेचना. भूमिती सुद्धा चौथ्या इयत्तेत सुरू होते. मी भूमितीत मागे पडलो होतोच. शिवाय ती मुळीच समजेना. भूमितीचे शिक्षक समजावून देण्यात हुशार होते. परंतु माझे काही बस्तानच बसेना. मी अनेक वेळा निराश होत असे. कित्येक वेळा असेही वाटे, की दोन इयत्ता सोडून देऊन परत तिसऱ्या इयत्तेचा मार्ग धरावा. परंतु तसे केल्यास माझी अब्रू जाईल व मी झटून अभ्यास करीन या विश्वासावर ज्या शिक्षकांनी मला वर चढविण्याबद्दल शिफारस केली, त्या शिक्षकांचीही अब्रू जाणार, या भयाने खाली उतरण्याचा विचार मी रद्द केला. प्रयत्न करता करता जेव्हा युक्लिडच्या तेराव्या प्रमेयाशी आलो तेव्हा एकाएकी मला वाटू लागले की भूमिती तर सोप्यात सोपा विषय आहे. ज्यात बुद्धीचा फक्त साधा व सरळ उपयोग करायचा आहे, त्यात अडचण ती कसली ? त्यानंतर नेहमी मला भूमिती हा सोपा व रसिक विषय होऊन राहिला.

**शब्दार्थ :** वर्तन – वागणूक, उणीव कमतरता; कमी, कवायत – व्यायाम; कसरत, विलायत – परदेश, पस्तावणे – पश्चाताप होणे, हेळसांड – दुर्लक्ष, रेखाकला – चित्रकला, बेत – हेतू, बस्तान बसणे – जम बसणे, मोकळीक – परवानगी, सुटका, वेदना होणे – त्रास होणे, शिफारस – वशिला; तारीफपत्र, प्रमेय – गणितीय सत्यांच्या आधारे पडताळलेले समीकरण वा गणितीय घटना, दैवाचा भाग–नशिबाचा भाग

**टिपा :** युक्लीड - युक्लिड ऑफ अलेक्झांड्रिया हे इ.स.पू. 330 ते 275 च्या काळातील ग्रीक गणितज्ज्ञ होते. त्यांना भूमितीचा जनक असेही म्हटले जाते. एक नामवंत गणिती म्हणून युक्लिड यांचे नाव गणिताच्या क्षेत्रात प्रामुख्याने भूमितीच्या संदर्भात अजरामर आहे. भूमितीशास्त्रात त्यांचे संशोधन कार्य अजोड आहे.

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

# स्वाध्याय

## I. खालीलपैकी योग्य पर्याय निवडून लिहा.

1. गांधीजींसह किती भाऊ एकाच शाळेत शिकत होते ?

   अ) दोघे  ब) चौघे  क) तिघे  ड) एकटेच

2. पाचव्या-सहाव्या इयत्तेत अनुक्रमे इतक्या रुपयांची शिष्यवृत्ती गांधीजींनी मिळविली.

   अ) पन्नास व शंभर  ब) दहा व वीस  क) पंचवीस व पन्नास  ड) चार व दहा

3. शाळेच्या हेडमास्तरांचे नाव होते

   अ) जमशेदजी मेहता  ब) दोराबजी एदलजी गिमी  क) गो. ग. आगरकर  ड) जिमी अमरनाथ

4. शनिवारी शाळेत कवायत यावेळी असायची.

   अ) बारा  ब) सात  क) दहा  ड) चार

5. या इयत्तेपासून गांधीजींचे काही शिक्षण इंग्रजीतून होऊ लागले

   अ) चौथी  ब) पाचवी  क) सहावी  ड) सातवी

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

1. लग्नामुळे गांधीजींची किती वर्षे वाया गेली ?
2. शिष्यवृत्ती कोणत्या प्रांतातल्या विद्यार्थ्यांसाठी होती ?
3. हेडमास्तरनी वरच्या इयत्तांच्या विद्यार्थ्यांस काय अनिवार्य केले होते ?
4. कशाचे फायदे गांधीजींनी पुस्तकांत वाचले होते ?
5. कोणाची हस्ताक्षरे मोत्यासारखी होती ?

## III. खालील प्रश्नांची दोन - तीन वाक्यात उत्तरे लिहा.

1. कोणत्या गोष्टीला शिक्षणाच्या बरोबरीचे स्थान विद्यार्जनात असले पाहिजे ? का ?
2. रेखाकले संबंधी गांधीजींचे काय मत आहे ?
3. गांधीजींना भूमिती हा विषय केव्हा सोपा वाटू लागला?

## IV. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

1. विद्याभ्यासासंबंधी नमूद केलेल्या दोन आठवणी कोणत्या ?

## V. ससंदर्भ स्पष्ट करा.

1. "फिरणे हाही व्यायाम आहे."
2. "चांगले अक्षर हे विद्येचे आवश्यक अंग आहे."

## भाषाभ्यास

### अ) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.

विवाह, बक्षीस, दंड, विलायत, पक्षी,

### ब) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.

दैव, दु:ख, फायदा, हजर, निर्दोष, सत्य, अब्रू, विश्वास

### क) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

दैवाचा भाग, खूप वेदना होणे मोकळीक मिळविणे, बस्तान बसविणे, हेळसांड करणे

### उपक्रम :-

तुमच्या परिसरात शिक्षणात होणाऱ्या नव्या प्रयोगांची माहिती मिळवा.

स्वातंत्र्य सैनिकांना शिक्षणात आलेल्या अडचणींची माहिती करून घ्या.

तुम्हाला शाळेत आलेले अनुभव तुमच्या शब्दांत लिहा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

3

# आऊ

वि.द. घाटे

C5T1K8



**परिचय:-** वि.द. घाटे पूर्ण नाव विठ्ठल दत्तात्रेय घाटे (1895 - 1978) हे मराठी कवी, लेखक आणि शिक्षणतज्ज्ञ होते. त्यांनी शालेय पुस्तके, शैक्षणिक ग्रंथ, कविता, व्यक्तिचित्रे, ललित, निबंध, आत्मवृत, नाटके असे विविध प्रकारचे लेखन केले. आचार्य अत्रे यांच्या बरोबर त्यांनी शालेय पाठयपुस्तक म्हणून नावाजलेली 'नवयुग वाचनमाला' संपादित केली होती. ते शिक्षण खात्यात अधिकारी म्हणून कार्यरत होते. अहमदाबाद येथील मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. 'दिवस असे होते' हे आत्मचरित, 'कांही म्हातारे व एक म्हातारी', 'पांढरे केस हिरवी मने' व्यक्तिचित्रण, 'नाट्यरूप महाराष्ट्र' (इतिहास) ही पुस्तके प्रसिद्ध. बेळगावमधील सरकारी बी. एड. महाविद्यालयात प्राचार्य म्हणून काम केले आहे.

काही व्यक्ती त्यांच्या आचारविचारामुळे चटकन नजरेत भरतात या पाठातील 'आऊ' ही अशीच एक व्यक्ती आहे. ती खेडयात राहणारी असली तरी तिचे शिक्षणाविषयी असणारे विचार आणि आचार, कृती पाहून कोणालाही अचंबाच वाटेल. अशा ह्या आऊंची ओळख करुन घेऊया. 'पांढरे केस हिरवी मने' या व्यक्तिचित्रण संग्रहातून 'आऊ' हा पाठ संपादित करून घेण्यात आलेला आहे.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**(मूल्य – जिद्द, शिक्षणप्रेम)**

धुळाप्पाकडे जिरें घातलेले फक्कड ताक पिऊन आम्ही त्यांचा निरोप घेतला आणि वाट चालूं लागलो. दुसऱ्याच वळणावर एक म्हातारी आडवी आली, समोर उभी राहिली. आणि बसु हसली !

मी तिला न्याहाळून पाहिलें. वय खूप झालें होतें. पण सुरूच्या झाडासारखी ती ताठ उभी होती. केसांच्या अंबाडया झाल्या होत्या. कोळयांच्या नाजुक जाळयाप्रमाणे तोंडावर नाजुक सुरकुत्यांचे जाळें पसरलें होतें. अनोळखी म्हातारी रस्ता अडवते काय, आणि जणू काय काहीच झाले नाही, काहीच केले नाही, अशा भावाने आमच्याकडे पाहून हसते काय! पण ते हसणे कसे स्वच्छ आणि मोकळे होतें. साया जगाला आपल्या जाळयांत सहज ओढण्याचें सामर्थ्य त्याच्यांत होते. ओळखीच्या बंधनाला-उपचाराला–ते कसचें जुमानते!

म्हातारी आमच्याबरोबर असलेल्या शिक्षकाला हसूनच म्हणाली,

"मास्तर, साहेबांना असेच कसे जाऊ देता वो? अजून आमची बुके बघायची आहेत ना ! चला घराकडे".

मास्तरांनी खुलासा केला,

''साहेब, ही आमची आऊ. साऱ्या गावाचीच आऊ. हिची मूळची भाषा कानडी. कानडीत आईला आऊ म्हणतात. तिच्या दोन्ही मुली आमच्या येथेच मुलींच्या शाळेत शिक्षिका आहेत. मुली हिला आऊ म्हणतात. आता सारे गावच तिला आऊ म्हणू लागले आहे. आऊ स्वत: निरक्षर आहे. पण शिक्षणावर तिची दांडगी श्रद्धा. तिने आपल्या मुलींना साक्षरतेचे वर्ग काढायला लावलें. घरोघर हिंडून ती बायांना गोळा करते. आऊ हिंडते आणि तिच्या मागोमाग तिची सुमन हिंडते. आऊने आता वाचायला शिकलेल्या बायांसाठी वाचनालय काढलेआहे. आपण ते पाहा आणि सुमन पण पाहा."

मी विचारले,

"सुमन कोण ?"

मास्तर हसून म्हणाले, "ती आऊचीच एक मुलगी आहे. भेटेल ती तुम्हांला. चला आपण आऊच्या वाचनालयाला भेट देऊ''.

आम्ही बोळांत वळलों आणि जवळच्या एका घरांत शिरलो. दाराजवळच डाव्या बाजूस एक लहानशी खोली होती. झाडूनसारवून लख्ख केली होती. भिंतीवर शिवाजीमहाराज आणि महात्मा गांधी यांची चित्रे टांगलेलीं होती. भिंतीशीच एक बसकें कपाट होते. आम्ही जाजमावर बसल्यावर आऊने मोठया अभिमानाने तें कपाट उघडलें आणि त्यांतून एकामागून एक लहानलहान पुस्तके काढून माझ्या हातीं दिलीं. किती पण नाजुकपणाने आणि जिव्हाळयाने! जणु काय ती तिची लहानलहान बाळेच होती ! पुस्तकांना छानदार पुठ्ठे घातले होते. पुस्तके पाहून झाल्यावर आऊने माझ्या हाती एक रजिस्टर दिलें. त्या रजिस्टरांत वाचनालयांतून पुस्तके नेणाऱ्या बायांची नोंद केली होती.

आऊने आमच्यापुढे ताकाचे प्याले आणले. मी हसून विचारले, "ताकच का ? लोणीबिणी नाही का?" आऊने उत्तर दिले.

"साहेब, ताक प्यायचेअसतेअन् लोणी विकायचेअसते. आम्हा जैनांच्या घरी तुम्हांला लोणी सापडणार नाही". मास्तर आऊला सहज म्हणाले,"आऊ, साऱ्या गावाला शिकवतेस, पण तूं मात्र अशीच !"

आऊ उसळून म्हणाली,

"ते का? आता लिहायची सुरुवात केली आहे ना मी". "आऊंची मुलगी शेजारीच उभी होती. ती म्हणाली, "होय मास्तर, आऊचा अभ्यास जोरात चालू आहे. तिला आता अक्षरे गिरवण्याशिवाय दुसरे काही सुचतच नाही. परवा रात्री मोठी गंमत झाली. सांगू का ग आऊ ?"

NOT TO BE REPUBLISHED @KTBS




आऊने डोळे वटारले, पण तिकडे न पाहतां मुलगी पुढे म्हणाली, “ साहेब, ते असं झाले. परवा संध्याकाळी आऊला मी पाटीवर अक्षरें काढून दिली. आऊने पाटीवर अक्षरे गिरवली, बोटांनी भिंतीवर-गिरवली, रस्त्यावरच्या धुळीतसुद्धा गिरवली. तेवढ्याने तिचे समाधान झाले नाही. रात्री माझ्याजवळच झोपली होती. मध्यरात्री मला जाग आली. कोणी तरी माझ्या तळपायाला गुदगुल्या करीत होते. मी दचकले. पाहते तर आऊ. मी विचारले, ‘काय ग आऊ, गुदगुल्या का करतेस अशी ?” आऊ थोडी वरमली आणि हसून म्हणाली, “काही नाही गं. कालचे ग म भ न पक्कें झालें का नाही ते पाहत होते. नीज आपली. आता नाही गिरवीत.”

आम्ही सारे जण हसलों. मला सुमनची आठवण झाली. मी विचारले, “ते सारे खरे; पण ती सुमन कोठे आहे ? तिला भेटवणार होता ना?” सारे जण परत हसले. मास्तर म्हणाले, “आऊ, जरा तुझ्या सुमनला हाक मार ग.”आऊने खणखणीत आवाजात साद घातली,“सुमे sss!’’

काही सेकंदांतच एक म्हैस जवळच्या गोठयातून बाहेर आली, दाराशीं उभी राहिली, आणि आऊकडे तोंड करून मोठयाने ‘हुँफ’ असा तिने जाब दिला. आऊ म्हशीजवळ गेली, तिच्या गळयात तिने हात घातला, प्रेमाने तिला थोपटले आणि ताटातलें एक केळ तिला खाऊ घातले.

मला हा प्रकार समजेना. मास्तर म्हणाले,“साहेब, ही आऊची तिसरी मुलगी. हिचे नाव सुमन.पोटच्या मुलींचे लहानपणी लाड केले नसतील, इतके या म्हशीचे लाड चालले आहेत. सुमनला सारे कळते. ‘सुमे, ये-’ म्हणून आऊने साद घातली की ती लगबग येते, ‘बस’ म्हटले की बसते, आऊ जाईल तिकडे तिच्या मागेमागे जाते.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

मास्तर सुमनची कहाणी सांगत होते. तिकडे सुमनचे लाड चालले होते. शेवटी आऊने' ''सुमे, जा गोठयांत'' असा हुकूम फर्मावला. सुमी गेली. त्या केसांच्या अंबाडया झालेल्या म्हातारीकडे कुतूहलाने पाहून मी विचारले,

"आऊ, तू म्हातारी झालीस. पिकले पान. केव्हा गळून पडेल नेम नाही. काही देवधर्म करतेस की नाही?"

आऊ, तोंडांत मारुन ताडकन म्हणाली,

"छे बा! त्या भानगडीत मी नाही पडत. ज्यांनी पापे केली असतील त्यांनी खुशाल देवधर्म करावा . मी कशाला करू?मी कधी बस्तीत जात नाही. साहेब, परवां ते आटपाडीचे बुवा आले होते. काय त्यांचा थाट! भोवताली बायकांचा घोळका जमला होता. बुवा आंघोळीला बसले. एक पाठीला तेल लावते, तर दुसरी हातापायाला, आणि तिसरी डोक्याला. चौथी अंगावर पाणी घालते. साहेब, या देवधर्मामुळे आमच्या बायका बिघडल्या बगा! मी साऱ्या बायकांना सांगते, नका जाऊ पंढरीला. नका जाऊ बुवाच्या मागे. आपल्या गावातच राहा. कचकून काम करा. लिहावाचायला शिका, चांगली बुके वाचा, मुलीबाळींना, सुनांना लिहावाचायला शिकवा..."

आऊशी पुष्कळ बोलावे, तिच्याकडून पुष्कळ शिकावे. असे मनाला वाटत होते. आऊपाशी एखादातरी दिवस घालवावा, असेही वाटत होत. पण गाडीची वेळ झाली होती. परत वरवर हसणाऱ्या, खोटं बोलणाऱ्या देवधर्म करणाऱ्या जगात शिरायचं होते. मी मुकाट्याने आऊच्या व्हिजिटर बुकांत शेरा लिहिला आणि बाहेर पडलो. आऊ मला पोचवायला कृष्णेपर्यंत आली. तिच्या पाठोपाठ तिची सुमन. मळी उतरून कृष्णेत पाय घालीपर्यंत मी मागे पाहत होतो. टेकाडावर ताठ मान करून आऊ उभी होती, आणि तिच्या मागे तिची लाडकी सुमन.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**शब्दार्थ :** निरक्षर – अक्षर ओळख नसलेला, वरमली – ओशाळली, मळी – नदीकाठची सुपीक जमीन, जाजम – सतरंजी, व्हिजीटरबुक – अभ्यागतपुस्तिका, रजिस्टर – नोंदवही, केसांचा अंबाडा होणे – केस पिकणे, बुक – पुस्तक, साद घालणे – हाक मारणे, लाड करणे – कोडकौतुक करणे, मान ताठ करणे – अभिमान वाटणे

## स्वाध्याय

**I. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

1. साहेबांना आऊची ओळख कोणी करुन दिली?
2. आऊची मुळची भाषा कोणती होती ?
3. कानडी भाषेत आईला काय म्हणतात ?
4. आऊच्या म्हैशीचे नाव काय होते ?
5. आऊ या पाठाचे मूल्य काय ?

## II. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा.

1. आऊने साहेबांना कशासाठी बोलावले?
2. आऊच्या घरी गेल्यावर कोणकोणत्या गोष्टी घडल्या?
3. आऊच्या खोलीचे वर्णन करा?
4. आऊच्या 'सुमन' विषयी माहिती लिहा?

## III. खालील प्रश्नांची उतरे पाच सहा वाक्यात लिहा.

1. आऊचे व्यक्तिचित्रण रेखाटा.
2. आऊने आपल्या अभ्यासाचा सराव कसा केला?
3. आऊने स्त्रियांना कोणता उपदेश केला?

## IV. कोणी कोणास म्हटले.

1. "साहेब ताक प्यायचे असते अन् लोणी विकायचं असते."
2. "सुमन कोण?"
3. "चला, आपण आऊच्या वाचनालयाला भेट देऊ."

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## भाषाभ्यास

**खालील वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

अ. केसाचा अंबाडा होणे  ब. साद घालणे  क. लाड करणे  ड. मान ताठ करणे

**तुम्हाला माहित असलेल्या इंग्रजी शब्दांना मराठी शब्द लिहा.**

उदा :- बुक - पुस्तक

अ) स्कुल – ☐  ब) नेचर – ☐

क) रजिस्टर – ☐  ड) लायब्ररी – ☐

**उपक्रम :-** 'वाचाल तर वाचाल' ह्या विषयावर पंधरा ओळी निबंध लिहा.

तुमच्या जवळच्या सार्वजनिक वाचनालयाला भेट द्या आणि माहिती लिहा.

4

# दोन मेघ

वि. स. खांडेकर

F4Y8R7



**परिचय:-** विष्णू सखाराम खांडेकर (1898-1976) हे प्रतिभावंत, ध्येयवादी, जीवनवादी लेखक होते. त्यांचे 'सांजवात', 'सूर्यकमळे' हे लघुकथासंग्रह प्रसिद्ध आहेत. 'दोन ध्रुव', 'उल्का', 'क्रौंचवध', या गाजलेल्या कादंबऱ्या आहेत. 'चांदण्यात', 'सायंकाळ', 'मंजिऱ्या' हे लघुनिबंध संग्रह प्रसिद्ध आहेत. तसेच, 'वनभोजन', 'गडकरी: व्यक्ती आणि वाङ्‌मय' इत्यादी लेखन त्यांनी केले आहे. त्याग, ध्येयवाद, लोकशिक्षण, लोकरंजन ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये. 'साहित्यकार जीवनाचा भाष्यकार असतो' या सुवचनाची प्रचिती त्यांच्या साहित्यातून येते. त्यांच्या 'ययाती' या कादंबरीला 1974 सालचा पहिला ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला आहे.

'दोन मेघ' ही रुपककथा त्यांच्या 'कलिका' या कथासंग्रहातून घेण्यात आलेली आहे. या रुपककथेत खूप मोठे जीवनभाष्य दडलेले आहे. कल्पित दोन ढगांवरून प्रत्यक्षातल्या मानवी जीवनावर खांडेकरांनी या रुपककथेतून भाष्य केले आहे. नि:स्वार्थीपणे सेवा केल्याने मानवी जीवन कृतार्थ होते हा संदेश या रुपककथेतून दिलेला आहे.

@TBS NOT TO BE REPUBLISHED

**(मूल्य :- त्याग, कृतज्ञता)**

दोघेही लगबगीने जांत होते. धक्का लागताच त्यांनी एकमेकांकडे पाहिले. दोन ढग होते ते !

पांढरा ढग वरवर जात होता ; काळा खाली खाली येत होता. पांढऱ्या ढगाने काळ्या ढगाकडे तुच्छतेने पाहिले.

क्षणभर थांबून तो उदगारला,

"कुठं निघालास?"

"पृथ्वीवर. तू कुठं चाललास?"

"स्वर्गात!"

पांढरा ढग उड्डाण करणाऱ्या विमानाप्रमाणे वरवर जाऊ लागला. तो काळा ढग मोडलेल्या विमानाप्रमाणे भरभर खाली येऊ लागला.



पांढऱ्या ढगाने अभिमानाने मागे वळून पाहिले. किती सुंदर दिसत होता काळा ढग ! त्याच्यातून लखखकन चमकणारी ती वीज दिव्यत्वाचा साक्षात्कार होता तो! पांढऱ्या ढगाने स्वतःकडे निराशेने पाहिले. विजेचा पुसट चमत्कारसुद्धा तिथे दिसत नव्हता. त्याने उत्सुकतेने वर पाहिले. लवकरच आपला स्वर्गात प्रवेश होणार या आनंदात त्याला काळ्या ढगातल्या त्या दिव्य तेजाचा विसर पडला. थोड्या वेळाने त्याने वळून खाली पाहिले.

काळा ढग कुठेच दिसत नव्हता. मात्र धरणी स्नानमंदिरातून बाहेर पडणाऱ्या तरुणीसारखी दिसत होती. वृक्षलता गुदगुल्या झालेल्या बालकांप्रमाणे हसत होत्या आणि पाखरे झाडावर बसून आनंदाने आपली अंगे झाडीत होती. पांढरा ढग स्वर्गाच्या दारात जाऊन पोचला. आपल्याला आत सहज प्रवेश मिळेल अशी त्याची कल्पना होती.

पण दारावरला रक्षक त्याला आत जाऊ देईना. तो सांगू लागला, "'आत एकच जागा रिकामी होती. पण ती नुकतीच भरली!"

आपल्या मागून येणारे पुष्कळ पांढुरके ढग या पांढऱ्या ढगाने पाहिले होते. तो आठवू लागला. छे! आपल्यापुढे कुणीच नव्हते! पांढरा ढग भांबावून गेला. त्याने विचारले.

'कुणाला मिळाली ती स्वर्गातली जागा?'

'एका काळ्या ढगाला !' रक्षक उत्तरला.

' काळ्या ढगाला ?'

"हो. 'तापून गेलेल्या पृथ्वीला शांत करण्याकरिता त्यानं आपलं सर्वस्व दिलं!"आकाशवाणी झाली.

**रुपक कथेचा भावार्थ :-**

जो इतरांच्या उपयोगी पडतो. इतरांचे जीवन फुलावे म्हणून आपल्या प्राणसर्वस्वाचा त्याग करतो. तोच या जगात श्रेष्ठ ठरतो. येथील काळ्या ढगाने 'तापून गेलेल्या पृथ्वीला शांत करण्याकरिता आपले जीवन सर्वस्व दिले' म्हणून त्याला स्वर्गात प्रवेश मिळाला.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

समाजात दोन प्रकारचे वर्ग असतात. एक वर्ग पोषाखी सधनांचा वर्ग असतो. तर दुसरा गरीब कष्टकऱ्यांचा वर्ग असतो. पांढऱ्या पोशाखातला सधनवर्ग अभिमानी, महत्वाकांक्षी व इतरांना गौण लेखणारा असतो. हा श्रीमंत वर्ग इतरांचे फक्त शोषण करतो. आपल्या धनाच्या बळावर सर्व सत्ता सुखे मिळवता येतात अशी त्यांची समजूत असते. तर कष्टकरी वर्ग हा सदैव कष्ट करीत राहतो. व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेपेक्षा समाजाचे कल्याण. समाजाची सेवा हेच अशा वर्गाचे ध्येय असते. या वर्गामुळेच समाजाचे भले होते..

वरून काळा ओबडधोबड वाटणारा कष्टकऱ्यांचा वर्ग हा मूल्ययुक्त जीवन जगतो. आपल्या श्रमातून दुस-यांचे जीवन फुलवतो. अशा श्रमिक पण त्यागी जीवनालाच  स्वर्ग प्राप्ती हाऊ शकते. दुसऱ्यांसाठी जगणे हेच जीवनाचे श्रेय आहे. ही जाणीव अशा त्यागी – परोपकारी माणसांमध्ये असते. ते जीवन सर्वस्व गमावूनही इतरांना अमृत बहाल करतात. त्याच्या जीवनालाच अर्थ आहे. हा अर्थ सूचित करण्यासाठी लेखकाने ही रुपक कथा लिहिलेलीआहे.

इतरांसाठी झिजणारा काळा ढग म्हणजे श्रमिकवर्ग होय तर पोशाखी अहंमन्य प्रवृत्तीचा पांढरपेशी वर्ग हा पांढरा ढग होय. काळ्या ढगाचे जगणे हेच मूल्ययुक्त जीवन होय. अशा जीवनाला विजांचे तेज व संजीवक पाण्याचे बळ प्राप्त झालेले असते. अशा वर्गालाच महत्त्व यावे. हेच खांडेकरांना सुचवायचे आहे.

**शब्दार्थ:-** लगबगीने – घाईघाईने, भरभर – वेगाने, तुच्छतेने – तिरस्काराने, पुसट – धुसर, साक्षात्कार – अनुभव, भांबावणे – काहीही न सुचणे, वृक्ष – झाड, लता – वेल, मेघ – ढग, विसर पडणे – लक्षात न राहणे, रक्षक - रक्षण करणारा.

**रुपक कथा :-** बालपणापासून आपल्याला कथा खूप आवडतात विज्ञान कथा, जातक कथा, साहस कथा, रहस्य कथा असे कथेचे अनेक प्रकार आहेत. यांपैकी एक प्रकार म्हणजे रुपककथा होय. रुपक कथेची वैशिष्टय म्हणजे ती आकाराने लहान असते  अर्थघनत्व, कल्पकता, सूचकता, मार्मिकता त्याच बरोबर एखादे महान जीवनसत्व चिमुकल्या कथेतून व्यक्त करण्याचे सामर्थ्य असते. ही रुपक कथेची वैशिष्ट्ये आहेत.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

### I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1. 'दोन मेघ' या कथेचा साहित्य प्रकार हा आहे.

   अ) विनोदी कथा  ब) दलित कथा  क) रूपक कथा  ड) ग्रामीण  कथा

2. ‘दोन मेघ’ ही कथा खालीलपैकी कोणत्या पुस्तकातून घेतलेली आहे ?

   अ) दोन ध्रुव  ब) दोन मने  क) क्रौंचवध  ड) कलिका

3. या कथेत खांडेकरांनी कोणती रुपके वापरली आहेत ?

अ) दोन मेघ ब) दोन व्यक्ती क) दोन नक्षत्र ड) दोन वृक्ष

4. वि. स. खांडेकर यांच्या कोणत्या कादंबरीला ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला आहे.

अ) क्रौंचवध ब) दोन ध्रुव क) ययाती ड) रिकामा देव्हारा

## II. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

1. वि. स. खांडेकरांचे पूर्ण नाव लिहा ?
2. काळा ढग खाली का येत होता?
3. पृथ्वी कशी दिसत होती ?
4. पांढऱ्या ढगाला स्वर्गाच्या दारावर कोणी अडवले?
5. स्वर्गात किती जागा शिल्लक होत्या ?

## III. खालील प्रश्नांची उत्तरे दोन तीन वाक्यात लिहा.

1. पांढऱ्या ढगाने काळ्या ढगाकडे तुच्छतेने का पाहिले?
2. पांढऱ्या ढगाला कोणत्या दिव्यत्वाचा विसर पडला?
3. काळ्या व पांढऱ्या ढगाची भेट कशी झाली?
4. 'दोन ढग' हे रुपक कोणासाठी वापरलेले आहे ?

## IV. खालील प्रश्नांची उत्तरे पाच ते सहा वाक्यात लिहा.

1. पांढऱ्या ढगाला स्वर्गातील जागा का मिळाली नाही ?
2. स्वर्गातील जागा काळ्या ढगाला का मिळाली ते सांगा?
3. काळ्या ढगाच्या माध्यमातून लेखकाला काय सांगावयाचे आहे ?
4. पांढऱ्या ढगाच्या माध्यमातून लेखकाला काय सांगावयाचे आहे ?

## V. कोणी कोणास म्हटले ते सांगा.

1. "एकच जागा रिकामी होती. पण ती नुकतीच भरली ?"
2. "कुणाला मिळाली ती स्वर्गातली जागा?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## VI. आकृती पूर्ण करा.




## VII. विरुद्धार्थी शब्द लिहा

काळा X

स्वर्ग X

देव X

रक्षक X

शांत X

सुंदर X

**उपक्रम :-** तुमच्या परिसरात नि:स्वार्थीपणे सेवा करणाऱ्या समाजसुधारकांची माहिती मिळवा.

श्रीपाद म. माटे यांचे 'उपेक्षितांचे अंतरंग' हे पुस्तक मिळवून वाचा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

5

# हंपीचे कलावैभव

गंगाधर गाडगीळ

S1K3G3



**परिचय:-** गंगाधर गोपाळ गाडगीळ (1923-2008) हे मराठीतील नवकथाकार, लेखक, अर्थतज्ज्ञ व साहित्यसमीक्षक होते. त्यांनी मुंबई येथे काही काळ अध्यापनाचे कार्य केले. नंतर मुंबईच्या 'नरसी मोंजी कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स'चे प्राचार्य होते. त्यांनी विविध विषयावर लेखन केले. ‘अमृत’ , ‘आठवण’, ‘उदध्वस्त विश्व’, ‘ऊन आणि पाऊस’ हे त्यांचे कथासंग्रह. ‘गंधर्वयुग’, ‘दुर्दम्य’, ‘प्रारंभ’, ‘मन्वंतर’ या कादंबऱ्या. ‘गोपुरांच्या प्रदेशात’, ‘चीन एक अपूर्व अनुभव’, ‘नायगाराचं नादब्रह्म’, ‘रॉकी’ अमेरिकेचा हिमालय, ‘साता समुद्रापलीकडे’ ही प्रवासवर्णने. ‘आम्ही आपले थोर पुरुष होणार’, ‘ज्योत्स्ना आणि ज्योती’, ‘बंडुकथा आणि फिरक्या’ ही नाटके. ‘खडक आणि पाणी’, ‘पाण्यावरची अक्षरे’ हे समीक्षा ग्रंथ असे विपुल लेखन त्यांनी केले. 1981 मध्ये मध्यप्रदेश मधील रायपूर येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांच्या साहित्यिक कर्तृत्वाबद्दल 1996 चा 'साहित्य अकादमी पुरस्कार' देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

'हंपीचे कलावैभव' हा पाठ 'गोपुरांच्या प्रदेशात' या त्यांच्या प्रवासवर्णनातून संक्षिप्त करून घेतलेला आहे. या पाठातून विजयनगर साम्राज्याचे ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिक दर्शन घडते.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

### (मूल्य - संस्कृतीबद्दल आदर)

विजयनगर तुंगभद्रेच्या दक्षिण तीरावर आहे. ह्या तुंगभद्रेचे पूर्वीचे नाव म्हणे पंपा. मुस्लिम आक्रमणाचा खैबर खिंडीतून घुसलेला लोंढा गंगा यमुनांच्या तीरावर अडला नाही, विंध्याद्रीच्या पायथ्याशी थबकला नाही, यादवांच्या देवगिरीने त्याला टक्कर दिली नाही. तो अखेर या कृश तुंगभद्रेच्या तीरावर थोपला. दोनशे वर्षेपर्यंत तो लोंढा विजयनगरच्या दगडी तटांवर आदळत होता आणि गुरगुरत निरुपायाने मागे सरकत होता. आणि ह्या दोनशे वर्षांच्या काळात विजयनगरमध्ये हिंदु संस्कृतीच्या द्राविड शाखेचा असा काही उत्कर्ष झाला, शिल्पाचे आणि स्थापत्यकलेचे असे भव्य व संपन्न विलास झाले, कलांचा असा अदभूत विकास तेथे झाला आणि वैभवाची अशी भांडारे तेथे जमा झाली आहेत. विध्वंसानंतरही त्या संस्कृतीची स्मृति इतिहासात कायमची कोरलेली राहिली आहे. त्या विनाशाच्या ढिगाऱ्यावर विजयनगरची विजयपताका अजून फडकते आहे, कायमची फडकत राहणार आहे.



विजयनगरचा इतिहास रामायणकालापर्यंत पोहोचतो. ती म्हणे पूर्वीची किष्किंधा. तिथल्या लोकांनी आम्हाला असे सांगितले.पंचवटीहून रामेश्वराकडे जाणाऱ्या मार्गावरच ही भग्न नगरी आहे. अजूनही मोठी वानरसेना येथे क्रीडा करताना आढळते! ह्याच किष्किंधेत वाली आणि सुग्रीव यांचे युद्ध चालू असताना रामाने वालीचा वध केला. ते युद्ध चालू असताना त्यांनी परस्परांवर फेकलेल्या प्रचंड शिला अजून येथे इतस्ततः पडलेल्या आहेत. याच भूमीत कृष्णदेवरायासारखे पराक्रमी व निश्चयी राजे निर्माण झाले.

ह्या वैभवशाली नगरीचे वर्णन अनेक प्रवाशांनी करून ठेवलेले आहे. मुसलमान, युरोपियन ,सारेच या नगरीच्या वैभवाची प्रशंसा करताना आढळतात. अब्दुर रझाक हा प्रवासी म्हणतो की, अवनीतलावर अशी नगरी कोणी नजरेने पाहिलेली नाही आणि अशी दुसरी नगरी असल्याचे ऐकिवात नाही. एकाच्या आत एक अशा सात तटबंद्यात ही नगरी वसलेली होती. तिचा दक्षिणोत्तर विस्तार जवळ जवळ सात ते आठ मैल होता आणि पूर्व पश्चिम विस्तारदेखील तितकाच होता. तिच्या बाहेरच्या तीन तटबंद्यांत शेते, बागबगीचे, घरे होती. आणि आतल्या तटबंद्यांत बाजारांची आणि दुकानांची नुसती रीघ लागून राहिली होती. अगदी मध्यभागी राजाचे निवासस्थान होते. नगरीत ठिकठिकाणी बगीचे, देवालय आणि मन प्रसन्न करणारे जलाशय होते. तुंगभद्रेला बांध घालून दगडी पन्हळातून शहरात आणि विशेषतः राजप्रसादात पाणी खेळवलेले होते. राजवाडयातील एक दालन तर नुसते हस्तिदंताचे होते आणि त्यातले नक्षीकाम केवळ अप्रतिम होते. राजवाडयांतली भांडीकुंडी सगळी सोन्याचांदीची होती आणि काहींचा आकार नुसता अजस्त्र होता. राजाच्या खजिन्यात ओतीव सोन्याने भरलेल्या गुहा होत्या म्हणे!

त्या नगरीत असंख्य लोक राहत असत. त्यातल्या अनेकांच्या अंगावर रत्नांचे अलंकार असत आणि उघडया बाजारात रत्ने मांडलेली असत. विजयनगरचे काही राजे शैव होते आणि काही वैष्णव होते. पण हिंदूंच्या पद्धतीप्रमाणे सारे देव ह्या नगरात खेळीमेळीने वास करून राहत होते.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

जवळच असणारी एक सुंदर घुमटाची आणि कमानदार दरवाज्याची इमारत पाहून आम्ही विचारले,"हा कुठचा महाल?"

ड्रायव्हर म्हणाला,"छे, हा महाल नाही. हा राजाचा हत्तीखाना आहे." अशा इमारतीत राहणाऱ्या त्या हत्तींचे नशीब थोर ह्यात शंका नाही. बहुधा बेटे मधात बुडवलेला चारा खात असावेत.

अंत:पुरात 'कमल महाल' नावाची मोठी सुबक इमारत अजून शाबूत आहे. कमळाच्या पाकळ्यांसारखा नाजूक लालसर रंग त्या इमारतीचा आहे. कमलदलांचा नाजुकपणा त्या इमारतीच्या रचनेत, कमानीत आणि घुमटात पुन्हा पुन्हा जाणवतो. इमारतीत शिल्पकलेचे विलास नाहीत. पण नुसते रचनेचे सौंदर्य मनाला मोह घालण्यास समर्थ आहे. ज्या नगरीत सारे भव्य, अजस्त्र आणि शिल्पकृतींनी मढलेले आहे, तेथे ही नाजुक, साधी इमारत आपल्या निराळ्या सौंदर्याने स्मरणात राहते.

ह्या अंतःपुरापासून थोड्या अंतरावर राजस्त्रियांचे स्नानगृह आहे. स्नानगृहाच्या दगडी भिंती उंच आहेत. स्नानगृहाच्या मध्यभागी स्नान करण्याचा हौद आहे. भोवती सुंदर नक्षीकाम केलेले सज्जे आहेत.

विजयनगरमध्ये अनेक देवालये आहेत आणि सगळी आपापल्या परीने सुंदर आहेत. हजार रामस्वामी देवालयात सगळे रामचरित्र कोरलेले आहे. मातंग ऋषींच्या टेकडीवर एक देवालय दिसते. टेकडी कसली, ओक्या बोक्या अणकुचिदार शिलांची रासच ती.

ह्या टेकडीवर म्हणे मातंग ऋषि तपश्चर्या करीत असत. वाली आणि सुग्रीव यांचे भांडण झाले तेव्हा सुग्रीवाने पळून जाऊन  ह्या ठिकाणी आसरा घेतला होता.कारण वालीने एका राक्षसाचा वध करून त्याचे प्रेत तेथे भिरकावून दिले असल्याकारणाने मातंग ऋषींनी चिडून त्याला शाप दिला होता आणि त्यामुळे त्या टेकडीवर येणे वालीला शक्य नव्हते. ह्या टेकडीवर एक देवालय आहे. त्यात काळ्या पाषाणाची परशुरामाची मूर्ती आहे.

विजयनगरला पहाण्यासारखी दोन महत्त्वाची देवळे म्हणजे एक विठ्ठलस्वामींचे आणि दुसरे वीरुपाक्ष.



©KTBS NOT TO BE REPUBLISHED

दक्षिणेत विष्णूची देवालये पुष्कळ आहेत. आम्ही विष्णूला विठोबा या नावाने ओळखतो. ह्या देवालयाच्या सभोवती दगडी तट आहे आणि त्याच्या तीन बाजूंना सुंदर गोपुरे आहेत .गोपुरे म्हणजे प्रवेशद्वारे. पूर्वी आर्यांच्या गावांच्या भोवती लाकडी कुंपण असे आणि त्या कुंपणांतून चरायला जाणाऱ्या गाईसाठी एक द्वार असे .ह्या द्वाराला गोपूर म्हणतात. हे गोपूर म्हणजे मोठे दगडी प्रवेशद्वार असते आणि त्या प्रवेशद्वाराच्या वर उंचच उंच निमुळते होत गेलेले विटांचे बांधकाम असते. या उंच होत गेलेल्या रचनेच्या प्रत्येक मजल्यावर देवादिकांच्या आणि त्यांचे अवतारकार्य दर्शविणाऱ्या अनेक शिल्पाकृती कोरलेल्या असतात. डोंगराच्या उतारावर जसे झाडांचे जंगल माजलेले असते तसे हे शिल्पाकृतींचे जंगलच गोपुराच्या निमुळत्या होत गेलेल्या बाजू भरून टाकते आणि त्याच्या भव्यपणात व रचनेच्या प्रमाणबद्धतेत भर टाकते. देवालयाचा असा एक कोपरा नव्हता की यावर शिल्पकारांनी आपल्या कलेचे संस्कार केले नव्हते. सुंदर शिल्पांचे ते वैपुल्य पाहून मन भांबावून जात होते.

मुख्य गोपुरातून आत गेल्यावर समोर मोकळ्या प्रांगणात एक सुंदर दगडी रथ आहे. एकाच प्रचंड शिलेतून हा कोरलेला असावा असे वाटते पण खरोखर त्याकरिता अनेक शिला वापरण्यात आलेल्या आहेत.

विठ्ठलस्वामींच्या देवालयाच्या चार बाजूंना चार मंडप आहेत आणि मध्यभागी देवालय आहे. ह्या मंडपातील  व देवालयातील  शिल्पांचे वैपुल्य, सौष्ठव व सौंदर्य पाहून भान हरपते. एकेका खांबांत अदभूत सौंदर्य होते. त्या खांबांनी देवालय सावरले आहे.

विरूपाक्षाचे देवालय हे हंपीतले सर्वात जुने आणि महत्त्वाचे आहे. देवालयासमोर दोन प्रचंड लाकडी रथ आहेत. विरूपाक्षाचे देवालय मोठे आहे त्याच्या भव्य गोपुराची उंची दीडशे फुटांहून अधिक आहे .आत शिल्पकलेचा विपुल विलास आहेच; पण वर चुना फासटून त्या सौंदर्याला अकारण उणेपणा आणला गेला आहे. देवळाच्या आवारात सुग्रीवाचे वंशज पुष्कळ आहेत.

मधेच आम्हाला एक अखंड शिलेचे प्रचंड शिवलिंग दिसले .त्याची उंची दहा फूट तरी असावी. त्याच्यावर अभिषेक करायचा म्हणजे वरच्या मजल्यावर जावे लागते .अशीच एक दुसरी गणपतीची मूर्ती आहे आपले अगडबंब, लोंबणारे पोट गणरायाने पोटाभोवती एक नाग गुंडाळून सावरून धरले आहे. ह्या गणपतीला उपरोधाने कानडीत राईएवढा गणेश म्हणतात.उग्र नरसिंहाची जी मूर्ती तेथे आहे, तिच्या भव्यतेने तर डोळे फिरतात. तिची उंची बावीस  फूट आहे म्हणे .या नरसिंहाच्या मस्तकावर सहा तोंडांच्या शेषाने आपली फणा धरली आहे.

संध्याकाळ झाली. सूर्य मावळला, पण आमचे पाहणे संपले नव्हते. विशेषतः चक्रतीर्थ पहायचे राहिले म्हणून मनाला चुटपुट लागली. येथे म्हणे तुंगभद्रा मोठे वळण घेते आणि दोन टेकडयांमधल्या अरुंद फटीतून तिचे पाणी वेगाने वाहत जाते. प्रवाहाच्या वेगाने म्हणे तेथे किनाऱ्याच्या दगडात गुहा निर्माण झाल्या आहेत. आमच्या पूर्वजांनी नेहमीच्या पद्धतीप्रमाणे ते तीर्थस्थान ठरवून टाकले आहे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

संधिप्रकाशाचे सारवण त्या भग्न अवशेषांवर पडू लागले आणि ते ठिकाण अधिक भयाण व एकाकी वाटू लागले. विजयनगरच्या साम्राज्याचा जेथे अंत झाला ते स्थल सूर्यनारायण रोज असे संधिप्रकाशाने सारवतो आणि मग त्यावर आकाशातल्या पणत्या तेवत असतात.

**शब्दार्थ -** कृश – अशक्त, अपूर्व - कधीही न झालेले, तटबंदी - किल्ल्याभोवतालची भिंत, निरूपाय - उपाय नसलेले, क्रूर-निर्दय, दालन – कक्ष,उत्कर्ष - प्रगती, भरभराट, विध्वंस – नाश, महाल - राजे लोक राहण्याचे ठिकाण, वैभव – श्रीमंती, स्मृती – आठवण, भांडार – साठा, अवनी – पृथ्वी, पाषाण – दगड, गोपुरे - देवालयाचे मुख्य प्रवेशद्वार, भव्य – प्रशस्त, अगडबंब - फार लठ्ठ, टक्कर देणे – संघर्ष करणे, मन प्रसन्न होणे – आनंद होणे, मोह होणे – आशा लागणे, शाप देणे – अनिष्ट चिंतन, उणेपणा येणे – कमीपणा येणे, चुटपुट लागणे – वाईट वाटणे, मात करणे – पराभव करणे, प्रशंसा करणे – कौतुक करणे.

## स्वाध्याय

### I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) विजयनगर तुंगभद्रेच्या कोणत्या तीरावर आहे?

अ) उत्तर ब) पूर्व क) दक्षिण ड) अग्नेय

2) विजयनगर ही नगरी एकाच्या आत एक अशा किती तटबंध्यात वसलेली आहे?

अ) आठ ब) सात क) चार ड) दोन

3) कोणत्या देवालयात सगळे रामचरित्र कोरलेले आहे?

अ) हजार रामस्वामी ब) नरसिंह क) वीरूपाक्ष देवालय ड) गणपती

4) राजगृहातील एक दालन कशाचे आहे?

अ) हस्तिदंताचे ब) दगडांचे क) विटांचे ड) लाकडांचे

5) अंत:पुरात कोणत्या नावाची मोठी इमारत आहे?

अ) विजय महाल ब) लाल महाल क) गुलाबी महाल ड) कमल महालप्रश्न

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

1) तुंगभद्रेचे पूर्वीचे नाव काय होते?

2) वाली आणि सुग्रीव यांचे युद्ध कोठे झाले होते?

3) विजयनगर मध्ये पाहण्यासारखी कोणती दोन महत्त्वाची देवालये आहेत?

4) मातंग ऋषींनी कोणाला शाप दिला होता?

5) विजयनगरमध्ये हिंदू संस्कृतीच्या कोणत्या शाखेचा उत्कर्ष झाला आहे?

## III. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

1) अब्दुर रझाक या प्रवाशाने विजयनगरचे वर्णन कसे केले आहे?

2) गोपुरे म्हणजे काय?

3) चक्रतीर्थाबद्दल थोडक्यात माहिती लिहा.

## IV. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

1) कमल महाल या इमारतीचे वर्णन करा?

2) विजयनगरच्या प्राचीन इतिहासाविषयी माहिती लिहा.

## V. खालील प्रश्नांची सात ते आठ वाक्यात उत्तरे लिहा.

1) विठ्ठल स्वामींच्या देवालयाचे वर्णन करा.

2) विरूपाक्ष देवालयाचे वर्णन करा.

## VI. संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

1) "आम्ही विष्णूला विठोबा या नावाने ओळखतो."

2) "अवनीतलावर अशी नगरी कोणी नजरेने पाहिलेली नाही."

3) "छे, हा महाल नाही. हा राजाचा हत्तीखाना आहे."

4) "हा कुठचा महाल?"

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## भाषाभ्यास

### अ) समानार्थी शब्द लिहा.

1) देवालय - 2) सोने -

3) पाषाण - 4) नदी -

5) स्त्री - 6) नगर -

### ब) विरुद्धार्थी शब्द लिहा.

1) विनाश ×

2) लहान ×

3) नाजूक ×

4) सुंदर ×

### क) वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

1) उत्कर्ष होणे - 2) टक्कर देणे -

3) निरुपाय होणे - 4) मन प्रसन्न होणे -

5) मोह होणे - 6) शाप देणे -

7) उणेपणा येणे - 8) मनाला चुटपुट लागणे -

9) मात करणे - 10) प्रशंसा करणे –

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

### उपक्रम:

1) कर्नाटकातील ऐतिहासिक स्थळांना भेटी देऊन त्याचे वर्णन तुमच्या शब्दात लिहा.

2) मीना प्रभुंचे 'चिनी माती' हे प्रवासवर्णन मिळवून वाचा.

3) पु. ल. देशपांडे यांचे 'अपूर्वाई' हे प्रवासवर्णन मिळवून वाचा.

# अभंग पुष्प

1

# हीन याती माझी देवा

R6S9F3

**संत चोखामेळा**



**परिचय:-** संत चोखामेळा (1274 -1338). संत ज्ञानेश्वरांच्या पंथातील संतकवी. जन्मकाळ अनिश्चित. मूळ गाव पंढरपूर जवळील मंगळवेढा. गावाच्या वेशीचे बांधकाम चालू असताना गावकूस कोसळून अपघाती मृत्यू. पंढरपुरातील विठ्ठलमंदीराच्या महाद्वारात संत नामदेवांनी त्यांची समाधी बांधली. दलित समाजात जन्मास आल्यामुळे तत्कालीन समाजात अस्पृश्यतेचे चटके सहन करावे लागले. त्यामुळे त्यांच्या अभंगात विठ्ठलभक्ती बरोबरच पद-दलितांचे दुःखही चित्रित झाले आहे.

प्रस्तुत अभंगात, आपण अस्पृश्य असल्याने देव विटेल म्हणून पुजारी विठ्ठलाजवळ येऊ देत नाही. त्यामुळे देवाची सेवा घडू शकत नाही. हाताचा स्पर्श झाला तरी पाणी शिंपडून लोक स्वतःला शुद्ध करून घेतात, अशी खंत व्यक्त होते.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**(मूल्य : आर्तता)**



हीन याती माझी देवा । कैसी घडे तुझी सेवा ||

मज दूर दूर हो म्हणती । तुज भेटूं कवण्या रीती ॥

माझा लागतांची कर | सिंतोडा घेताती करार ||

माझ्या गोविंदा गोपाळा । करुणा भाकी चोखामेळा ||

**शब्दार्थ :-** याती - जात, कवण्यारीती - कोणत्यारीतीने, कर - हात, करुणा - दया, भाकी - आश्वासन दे अशी विनवणी करतो.

**सारांश :-** या अभंगातून संत चोखामेळांनी विठ्ठलाला प्रश्न विचारले आहेत. माझी जात ही अस्पृश्य असल्यामुळे विठ्ठला तुझी सेवा भक्ती मला करता येत नाही. मग तुझी भक्ती कशी करू ?

अस्पृश्य असल्यामुळे मला सवर्ण लोक दूर दूर हो म्हणत आहेत. विठ्ठलाच्या मंदिराजवळ येऊ देत नाहीत. मग तुला कोणत्या मार्गाने भेटू ?

माझ्या हाताचा स्पर्श लागतात लोक पाण्याचा शिंतोडा घेऊन शिंपडतात.

माझ्या गोविंदा गोपाळा माझ्यावर तुझा कृपाशीर्वाद राहू दे. अशी संत चोखामेळा विठ्ठलाला आर्ततेने विनवणी करत आहेत.

## स्वाध्याय

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

### I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून उत्तरे लिहा.

1) याती या शब्दाचा अर्थ या अभंगात काय होतो?

अ) जात ब) यातना क) यातायात ड) त्रास

2) लोक चोखामेळ्यास काय म्हणतात ?

अ) जा, जा ब) दूर, दूर क) ये, ये. ड) नको, नको

### II. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

1) संत चोखामेळ्यास कोणास भेटण्याची ओढ लागली आहे ?

2) संत चोखामेळ्याला विठ्ठलाजवळ का येऊ देत नाहीत ?

### III. खालील प्रश्नांची उत्तरे दोन तीन वाक्यात लिहा.

1) संत चोखामेळांना समाज कसा वागवतो आहे याचे वर्णन करा.

### IV. खालील प्रश्नांची उत्तरे चार पाच वाक्यात लिहा.

1) 'हीन याती माझी देवा' या अभंगातून संतचोखामेळा कोणती खंत व्यक्त करतात ?

### V. संदर्भासह स्पष्टीकरण करा.

1) "हीन याती माझी देवा । कैसी घडे तुझी सेवा।”

## भाषाभ्यास

**अ) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

1) दूर 2) हीन

**ब) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

1) करुणा 2) कर 3) सेवा 4) याती

**क) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

1) करुणा भाकणे 2) सेवा करणे



@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**शब्दखेळ :-** ' ट ' या अक्षराचा शब्द पंखा पूर्ण करून आपण शब्द ज्ञानाचा वारा घेऊया.

1) वर्णमालेतील अकरावे व्यंजन.

2) पोस्टाद्वारे येणारी पत्रे.

3) रायगडावरील एका टोकाचे नाव.

4) आघात, प्रहार याचा समानार्थीशब्द.

5) धनुष्याची दोरी ओढल्यावर येणारा आवाज.

6) मृदु शब्दाचा विरुद्धार्थी शब्द.

7) समद्रात येते ती ला.

*** खालील प्रमाणे तुम्ही शब्दाची लगोरी तयार करा.**

| चेंडू |
|---|
| मी खेळतो |
| मी चेंडू खेळतो |
| मी चेंडू छान खेळतो |
| मी चेंडू छान झेलून खेळतो |
| मी रबरी चेंडू मित्रांसोबत छान झेलून खेळतो |

| सायकल |
|---|
| |
| |
| |
| |
| |

**उपक्रम :-**

* तुमच्या गावातून आषाढी, कार्तिकी एकादशीसाठी पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांचे किंवा दिंडीचे निरीक्षण करा व त्यांनी गायलेले अभंग शोधून संग्रह करा.

* संत चोखोबांच्या अंभागाच्या आधारे तत्कालीन समाजाचे स्वरुप समजावून घ्या.

* वारकरी पंथातील एका संतावर सविस्तर माहिती लिहा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# संतकृपा झाली

**संत बहिणाबाई**



**परिचय:-** संत बहिणाबाई (1668-1700) वारकरी संप्रदायातील संत कवयित्री. संत तुकाराम यांच्या शिष्या. ओव्या,श्लोक, आरत्या इत्यादी रचना प्रसिद्ध. संत तुकाराम यांच्या काव्यरचनेचा आणि व्यक्तिमत्त्वाचा बहिणाबाई यांच्या काव्यरचनेवर प्रभाव जाणवतो. भक्तिभावनेचा उत्कट आविष्कार हा त्यांच्या अभंगरचनेचा विशेष आहे.हा अभंग रुपकात्मक आहे. प्रस्तुत अभंगात संत बहिणाबाई यांनी महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायरूपी इमारत उभारणीमध्ये संतांचा मोलाचा वाटा कसा आहे, याचे वर्णन केलेले आहे. हा अभग सकलसंतगाथा या ग्रंथातून घेतला आहे. डॉ. र. रा. गोसावी यांनी संपादित केलेल्या सकलसंतगाथा खंड दुसरा संत बहिणाबाईंचे अभंग, अभंग क्रमांक ३२ हा अभंग घेण्यात आला आहे.

**(मूल्य –भक्ती)**

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



संतकृपा झाली ।
इमारत फळा आली ॥१॥

ज्ञानदेवें रचिला पाया ।
उभारिलें देवालया ॥२॥

नामा तयाचा किंकर ।
तेणें रचिलें तें आवार ॥३॥

जनार्दन एकनाथ ।
खांब दिधला भागवत ॥४॥

तुका झालासे कळस ।
भजन करा सावकाश ॥५॥

बहिणी म्हणे फडकती ध्वजा ।
निरूपणा केलें बोजा ॥६॥

**शब्दार्थ :-** संतकृपा - संतांचा कृपाशीर्वाद, फळा आली - सफल झाली, यशस्वी झाली, पाया - मूळ दगड, जोते उभारिले - उभे केले , देवालय - मंदिर, देऊळ, तयाचा - त्याचा (इमारतीचा) किंकर - भिंतीचा दगड, तेणे - त्यांनी, आवार - गाभारा, प्रांगण, दिधला - दिला, सावकाश - हळूहळू, संथ गतीने, फडकती - लहरतात, ध्वजा - झेंडे, निशाण, पताका, निरूपण - विवेचन, प्रवचन, निवेदन, कीर्तन , बोजा - छान, सरस, तालेवार, बोजेवार, सविस्तर, भक्तिभावाने (* भिंतीच्या दगडाला 'कंकर' असे म्हणतात.)

**टिपा -**

(1) इमारत - (येथे अर्थ) वारकरी संप्रदायरूपी देऊळ

(2) ज्ञानदेव - संत ज्ञानेश्वर

(3) नामा - संत नामदेव

(4) जनार्दन - संत एकनाथांचे गुरु

(5) तुका - संत तुकाराम

(6) कळस - देवळाच्या शिखरावरील शुभचिन्ह

(7) भजन - देवाची आळवणी करणारे पद

(8) बहिणी म्हणे - संत बहिणाबाई म्हणतात

**अभंगाचा सारांश**

हा अभंग रूपकात्मक असून शब्दशः अर्थ घेऊन या अभंगाचा अर्थ न घेता या अभंगाचा आशय थोडक्यात खाली दिलेला आहे. महाराष्ट्रात संतांची परंपरा अखंड आढळते. संतांच्या अभंगातून समाजाची जडणघडण झाली आहे, अशा या संत परंपरेतील भागवत संप्रदायाचे प्रवर्तक, ज्येष्ठ संत, योगी, तत्त्वज्ञ, कवी संत ज्ञानेश्वर होते. त्यांनी ' ज्ञानेश्वरी ', चांगदेव पासष्टी, गौळणी, अभंग इत्यादी ग्रंथरचना केलेली आहे. अध्यात्म आणि तत्वज्ञान हा विषय मराठीतून व्यक्त केला आहे. समाजातील सर्व स्तरातील लोकांना त्यांनी आध्यात्मिक मार्ग दाखविला आहे.व विविध जातीच्या संतांना एकत्र करून आध्यात्मिक लोकशाहीचा पाया घातला. संत ज्ञानेश्वरांनी पाया घातलेला आहे म्हणून संत बहिणाबाई म्हणतात की ज्ञानदेवें रचिला पाया.

संत नामदेवांनी भागवत संप्रदायाचा विस्तार केला आहे. लोकांना नामस्मरणाचे महत्त्व व भक्तिमार्गाचे कार्य यांची जाणीव करून दिली. संत नामदेव हे ज्ञानेश्वर समकालीन होते. नामस्मरणाचे महत्त्व भक्ती मार्ग सर्वसामान्यांपर्यंत पोहचवण्यासाठी त्यांनी पंजाब पर्यंत भागवत संप्रदायाचा विस्तार केला, त्यांनी मराठी, हिंदी, पंजाबी तिन्ही भाषेमध्ये अभंग रचना केलेली आहे म्हणून त्यांना 'नामा तयाचा किंकर तेणे रचिले आवार' असे म्हटले आहे.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

संत एकनाथ हे पैठणचे राहणारे. त्यांच्या गुरूचे नाव जनार्दन स्वामी. वारकरी पंथाचे तत्त्वज्ञान प्रत्यक्ष व्यवहारात आणून लोकशिक्षण आणि मनोरंजन करणारे पहिले संत कवी संत एकनाथ. एकनाथांची ग्रंथरचना प्रचंड असून त्यात विविधता आहे. 'चतु:श्लोकी भागवत', 'एकनाथी भागवत', 'भावार्थरामायण', 'रुक्मिणी स्वयंवर' तसेच 'आनंद लहरी'. अध्यात्मिक प्रकरणे पौराणिक आख्याने, संत चरित्रे, असंख्य अभंग व भारुड ही रूपात्मक भक्ती आणि लोकरंजन यांचा मिलाफ असलेली आध्यात्मिक काव्यरचना केली आहे, म्हणून त्यांना 'जनार्दन एकनाथ खांब दिला भागवत' असे म्हटले आहे.

थोर क्रांतीकारक संत तुकाराम यांना खऱ्या भक्तीचे स्वरूप समजले होते. देव, धर्म, भक्तीतील ढोंग, कर्मकांड यावर संत तुकारामांनी अभंगाच्या माध्यमातून कठोर प्रहार केले आहेत. व समाजात जागृती केलेली आहे. सर्वसामान्य जनतेला त्यांच्याच भाषेत समजेल असे त्यांनी अभंग लिहिले आहेत. भक्तीचा मार्ग सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य केले आहे. त्यामुळेच त्यांना भागवत धर्माचा कळस असे म्हटले आहे.

संत बहिणाबाई या संत तुकारामांची शिष्या होत्या. तुकारामांच्या अभंगांचा प्रभाव त्यांच्यावर होता. संतांच्या अभंगाचे भक्ती भावाने निरूपण त्यांनी केले आहे. भागवत धर्माची पताका फडकविणाऱ्या या संत बहिणाबाई आहेत.

## स्वाध्याय

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

### I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून उत्तर लिहा.

1. भागवत धर्माचा पाया कोणी रचला आहे ?

   अ) नामदेव  ब) सोपानदेव  क) ज्ञानदेव  ड) रामदेव

2. संतकृपेमुळे काय फळा आले आहे?

   अ) देऊळ  ब) इमारत  क) मंदिर  ड) घर

3. भागवत धर्माचे आवार कोणी रचले आहे ?

   अ) संत एकनाथ  ब) संत तुकाराम  क) संत ज्ञानदेव  ड) संत नामदेव

### II. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

1. संत बहिणाबाई या कोणाच्या शिष्या होत्या ?
2. संत कृपा झाली या अभंगाचे मूल्य कोणते ?
3. अभंगात कोणती इमारत उभी केली आहे ?

## III. खालील प्रश्नांची उत्तरे दोन तीन वाक्यात लिहा.

1. संत ज्ञानेश्वरांच्या विषयी माहिती लिहा.
2. संत नामदेवांचे कार्य स्पष्ट करा.
3. संत बहिणाबाई यांच्या विषयी थोडक्यात माहिती लिहा.

## IV. खालील प्रश्नाचे उत्तर चार ते पाच वाक्यात लिहा.

1. वारकरी संप्रदायाची इमारत उभी करण्यासाठी केलेल्या संतांचे योगदान तुमच्या शब्दात लिहा.

## V. संदर्भासह स्पष्टीकरण करा.

1. नामा तयाचा किंकर | तेणे रचिले ते आवार ||
2. तुका झालासे कळस | भजन करा सावकाश ||

## भाषाभ्यास

### अ) जोड्या जुळवा.

| अ | ब |
|---|---|
| 1. संत ज्ञानेश्वर | अ) भागवत धर्माचा कळस |
| 2. संत नामदेव | ब) भागवत धर्माचा खांब |
| 3. संत एकनाथ | क) भागवत धर्माचा किंकर |
| 4. संत तुकाराम | ड) भागवत धर्माचा पाया |

### ब) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.

1) इमारत 2) देवालय 3) सावकाश 4) निरुपण

### क) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.

1) कृपा 2) रचणे 3) सावकाश 4) कळस

### उपक्रम.

* सकल संत गाथा याग्रंथातून संतांची माहिती वाचा.
* महाराष्ट्रातील विविध संतांच्या जीवनातील गोष्टी मिळवून वाचा.
* सर्व संतांची चित्रे मिळवा व त्याचा संग्रह करा.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

2

# घडयाळ

K7P6X7

**केशवसुत**



**परिचय:-** कृष्णाजी केशव दामले (केशवसुत) (1866 - 1904) गणपतीपुळयाजवळील मालगुंड हे त्यांचे जन्मगाव. 'आधुनिक मराठी काव्याचे जनक' असे त्यांना संबोधले जाते. केशवसुतांनी मराठी कवितेच्या प्राचीन परंपरेमध्ये परिवर्तन घडवले. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि मानवता या मूल्यांची जोपासना करणारी त्यांची कविता समाजातील रूढी परंपरेचा धिक्कार करते. मराठी कवितेत आशय रचना याबाबत अंतर्बाह्य क्रांतिकारक बदल त्यांनी घडवून आणले व काव्य विषयक नवीन दृष्टी दिली. त्यांना युग प्रवर्तक कवी असेही म्हणतात. केशवसुतांची कविता या नावाने त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. तुतारी, नवा शिपाई, हरपले श्रेय यासारख्या उत्तम कविता त्यांनी लिहिल्या. 'समग्र केशवसुत' या काव्यसंग्रहातून ही कविता संपादित करून घेण्यात आली आहे.

खालील कवितेत कवीने घडयाळासंबंधी सांगताना वेळ आणि घडयाळ यांचे मानवी जीवनातील स्थान दर्शवण्याचा प्रयत्न केला आहे.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**(मूल्य - वेळेचे महत्त्व)**

गडबड घाई जगांत चाले,
आळस डुलक्या देतो पण;
'गंभीरपणें घडयाळ बोले-
'आला क्षण- गेला क्षण !'

घडयाळास या घाई नाहीं,
विसांवाहि तो नाहीं पण,
त्याचें म्हणणें ध्यानीं घेई-
'आला क्षण- गेला क्षण !'

कर्तव्या जे तत्पर त्यांचें
दृढ नियमित व्हावयास मन
घडयाळ बोले अपुल्या वाचे
'आला क्षण- गेला क्षण !'



कर्तव्याला विमुख आळशी
त्यांच्या हृदयीं हाणित घण,
काळ - ऐक ! गातो अपुल्याशीं
‘आला क्षण - गेला क्षण !’

वार्धक्य जर सौख्यांत जावया
व्हावें, पश्चात्ताप नुरुनियां,
तर तरुणा रे ! मला वाटतें,
ध्यानीं सतत अपुल्या आण

घडयाळ जे हे अविरत वदतें -
‘आला क्षण - गेला क्षण !’

**शब्दार्थ :-** डुलक्या - बसल्या बसल्या येणारी झोप, विसावा - विश्रांती, आराम, तत्पर - तयार, दृढ - पक्के, निश्चयपूर्वक, ठाम, घण - मोठा हातोडा, वार्धक्य - म्हातारपण, पश्चाताप - पस्तावा, अविरत - सतत, ध्यानी घेई - लक्षात घेणे, विमुख - पाठ फिरवणारा.

**सारांश -** काळाच्या प्रवाहाची महती सांगताना कवी केशवसुत म्हणतात या जगात घाई गडबड चालते काही जण गडबडीत असतात काहीजण आळशीपणाने डुलक्या देत असतात पण त्याच वेळी घडयाळ गंभीरपणे बोलत असते की आलेला क्षण हा क्षणात भूतकाळात जमा होतो. किंवा गेलेला क्षण परत येत नाही.

घडयाळाला कोणत्याही प्रकारची घाई नसते, तसेच ते विश्रांतीही घेत नाही; पण ते जे सांगते ते लक्षात ठेवा. घडयाळ म्हणते आलेला क्षण क्षणात निघून जातो.

जे आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी नेहमी तयार असतात, त्यांचे मन ठामपणे नियमित होण्यासाठी घडयाळ आपल्या तोंडून संदेश देते, की आलेला क्षण थांबवता येत नाही, तो पुढच्या क्षणी भूतकाळात विलीन होतो.

जे लोक आळशीपणामुळे आपल्या कर्तव्याकडे पाठ फिरवतात त्यांच्या हृदयावर घणाचे घाव घालीत काळ स्वतःशीच म्हणतो, की क्षण कुणासाठीही थांबत नाही आलेला क्षण गेल्यात जमा होतो.

म्हातारपण जर सुखात जायचे असेल तर तारुण्यात कष्ट कर. नंतर पश्चाताप करण्यापेक्षा रे तरुणा मला वाटते सतत अपुल्या ध्यानात ठेव. घडयाळ जे नेहमी सांगते आलेला क्षण कधीच रहात नाही तो नेहमीच गेलेला असतो.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

### I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून उत्तर लिहा.

1) गडबड घाई कुठे चालली आहे ?

अ) मनात   ब) जगात   क) विचारात   ड) बोलण्यात

2) कवी कोणाचे म्हणणे ध्यानी घे असे म्हणतो ?

अ) दुसऱ्याचे   ब) स्वमनाचे   क) मोठयांचे   ड) घडयाळाचे

3) कोणाचे मन दृढ व्हावयास हवे असे घड्याळ म्हणते ?

अ) कर्तव्यहीन   ब) कर्तव्यचुकार   क) कर्तव्यतत्पर   ड) कर्तव्यशून्य

4) आपुल्याशीच कोण गातो आहे ?

अ) काळ   ब) क्षण   क) पळ   ड) घटिका

5) आला क्षण-गेला क्षण हे सतत ध्यानी कोणास ठेवावयास सांगितले आहे?

अ) म्हाताऱ्यांना   ब) तरुणाला   क) बालकांना   ड) प्रौढांना

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

### II. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

1) घडयाळ गंभीरपणे काय बोलते ?

2) घडयाळ कोणाच्या हृदयावर घाव घालते ?

3) वार्धक्य सुखात जायचे असेल तर काय केले पाहिजे ?

4) कर्तव्यास जे  तत्पर असतात त्यांचे मन कसे व्हावयास हवे ?

5) घाई आणि विसावा कोणास नाही असे कवी म्हणतो ?

### III. खालील प्रश्नांची दोन तीन वाक्यात उत्तरे लिहा.

1) घडयाळाचे म्हणणे ध्यानी घे  असे कवी का  सांगत आहेत ?

2) कर्तव्यतत्पर आणि कर्तव्यविमुख असलेल्या बाबत घडयाळ नेमके कोणते कार्य करते ?

3) घडयाळ आपल्याला अविरतपणे काय सांगत आहे हे स्पष्ट करा.

## IV. खालील प्रश्नाचे उत्तर चार-पाच वाक्यात लिहा.

1) माणसाच्या आयुष्यात वेळेचे महत्त्व खूप आहे हे कवीने कसे स्पष्ट केले आहे?

## V. संदर्भासह स्पष्टीकरण करा.

1) 'विसावाहि तो नाही पण'

2) 'ध्यानी सतत आपुल्या आणि'

## भाषाभ्यास

### अ) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.

1) घाई 2) विमुख 3) आळशी 4) सावध 5) गंभीर

### ब) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.

1) तत्पर 2) विसावा 3) नियमित 4) वार्धक्य 5) दृढ

### क) खालील वाक्प्रचारांचा अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा.

1) डुलक्या घेणे 2) ध्यानी घेणे 3) दृढ असणे 4) विमुख होणे 5) तत्पर असणे

6) पश्चाताप होणे

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

* खालीलपैकी कोणते पर्याय अक्षर रिकाम्या चौकटीत भरल्यास तिन्ही आडवे अर्थपूर्ण शब्द तयार होतील.

| | | |
|---|---|---|
| व | | न |
| ज | | न |
| प | | न |

1) व 2) त 3) च 4) ग

* रिकाम्या चौकटीत कोणते अक्षर वापरल्यास उभ्या शब्दाचा अर्थ ' तोंड ' आणि आडव्या शब्दाचा अर्थ ' घर ' होईल.

| | | |
|---|---|---|
| | व | |
| स | | न |
| | न | |

1) म 2) व 3) च 4) द

## उपक्रम :-

* दिवसभराच्या तुमच्या कार्याचे वेळेसह वर्णन लिहून काढा.
* सेकंद, मिनिट, तास हातातून निसटले तर केवढे नुकसान होते याची खेळ स्पर्धा, परीक्षा याबाबतीतले किंवा तुमच्या आजूबाजूला घडलेल्या घटनेतील उदाहरणे शोधून लिहा.
* 'वेळेचे महत्त्व' तुमच्या शब्दात दहा ओळीत लिहा.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

# 3 शाळा

केशवकुमार

X4B1M3



**परिचय:-** प्रल्हाद केशव अत्रे (केशवकुमार) (1898 - 1969) प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ, नाटककार, कवी, चित्रपट कथालेखक. 'साष्टांग नमस्कार', 'घराबाहेर, 'उद्याचा संसार', 'मी उभा आहे' इ. नाटके, 'झेंडूची फुले' हा विडंबनपर कवितासंग्रह, 'मी कसा झालो', 'सिंहगर्जना', 'सूर्यास्त', 'कऱ्हेचे पाणी' ही पुस्तके प्रसिद्ध 'तो मी नव्हेच', 'मोरूची मावशी', 'प्रीतिसंगम ही त्यांची नाटके रंगभूमीवर प्रचंड लोकप्रिय ठरली. ‘शामची आई’या चित्रपटाला राष्ट्रपती पुरस्कार मिळाला. त्याच्या साहित्यिक योगदानासाठी ‘विष्णुदास भावे’ पुरस्कार मिळाला.

प्रस्तुत गीतातून शाळेविषयीचे प्रेम, जिव्हाळा व कृतज्ञतेची भावना कवीने व्यक्त केली आहे.या कवितेचासाहित्य प्रकार ‘प्रार्थना गीत’ हा आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

(मूल्य - एकता)



ही आवडते मज मनापासुनी शाळा ।
लाविते लळा ही जसा माउली बाळा ।।

हासऱ्या फुलांचा बाग जसा आनंदी ।
ही तशीच शाळा, मुले इथे स्वच्छंदी ।।

हासुनी हसवुनी, खेळुनी, सांगुनी गोष्टी।
आम्हांस आमुचे गुरुजन शिक्षण देती ।।

हे प्रेम कराया किती भोवती भाऊ ।
हातांत घालुनी हात तयांच्या राहू ।।

येथेच बंधूप्रेमाचे, घ्या धडे ।
मग देशकार्य करण्याला, व्हा खडे ।।

पसरवा नाव शाळेचे, चहूकडे ।
मग लोक बोलतील धन्य धन्य ती शाळा ।
जी देशासाठी तयार करिते बाळा ।।

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## सारांश -

प्रत्येकाला लहानपणापासून आपली शाळा आवडत असते. बालपणी आपण शाळेत जायला अनेक तक्रारी करत होतो. याच तक्रारी नंतर आठवणी बनतात. आपण जीवंत असेपर्यंत त्या कमी होत नाहीत. शाळेतील सर्व आठवण करून देण्यासाठी आपल्या अभ्यासात आपल्या आवडणाऱ्या शाळेची काव्यरूपी गोष्ट अभ्यासताना खूप आनंद होतो.

मला माझी शाळा मनापासून आवडते. जिचा मला मनापासून लळा, आवड आहे. जी शाळा मला आईप्रमाणे माझा सांभाळ करते. माझ्या शाळेत हसऱ्या फुलांची बाग आहे. त्यामुळे आम्हाला आनंद मिळतो. येथे मुले स्वतंत्रपणे खेळू शकतात. येथे हसण्याचे हसविण्याचे अनेक प्रकार आहेत. आमच्यावर अशा अनेक गोष्टीतून चांगले संस्कार केले जातात. या गोष्टी आम्ही आमच्या गुरुजनांच्याकडून गोड आवाजात ऐकतो. या शाळेत आम्हाला अनेक भावंडे भेटतात.

जी एकमेकांवर जीवापाड प्रेम करतात. आम्ही यामुळे एकमेकांच्या हातात हात घालून एकतेने राहू हा विश्वास एकमेकाला देतो. येथे बंधुप्रेमाचे धडे दिले जातात. यातूनच देशकार्य करण्यासाठी आम्हाला बाळकडू दिले जाते.या शाळेने दिलेल्या ज्ञानाच्या शिदोरीवरती आम्ही आमच्या शाळेचे नाव चहूबाजूला करू हा विश्वास आमच्यातून व्यक्त होतो. मग सर्वजण आमच्या शाळेबद्दल धन्यता मानतील. आमच्या शाळेचे आमच्यावर खूप उपकार आहेत. या देशासाठी आम्हाला या शाळेने तयार केले आहे. देशकार्याची जाणीव ठेवून शाळेच्या ज्ञानाच्या आधारावरती हा देश अबाधित ठेवण्याची ध्येयपूर्ती आम्ही पूर्ण करू हा विश्वास या कवितेतून आपल्याला मिळालेला आहे.

**शब्दार्थ :**

मज - मला, लळा - आवड, माऊली - आई, जननी, हसऱ्या - हसणाऱ्या, स्वच्छंदी - मोकळे, स्वतंत्र, आनंदी खोडी - तक्रार गुरुजन - शिक्षक, तयाच्या - त्यांच्या, धडे - पाठ, खडे - उभे, चहूकडे - सर्व बाजूंनी.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

## स्वाध्याय

**I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून उत्तर लिहा.**

1. 'शाळा' या कवितेचे कवी हे आहेत.

   अ) प्र.के.अत्रे  ब) कुसुमाग्रज  क) केशवसूत  ड) गाडगीळ

2. 'शाळा' या कवितेचे मूल्य हे आहे.

   अ) देशभक्ती  ब) वात्सल्य  क) एकता  ड) प्रेम

3. 'शाळा' या कवितेचा साहित्य प्रकार हा आहे.

   अ) प्रार्थना गीत  ब) देशभक्ती  क) निसर्ग कविता  ड) ग्रामीण कविता

**II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या.**

1. मनापासून काय आवडते?
2. बाळाला कशाचा लळा लागला आहे?
3. शाळेसमोर काय काय आहे?

4. गुरुजन शिक्षण कसे देतात?

5. देश कार्यासाठी मुलांना कोण तयार करते ?

## III. रिकाम्या जागा भरा.

1. ही तशीच शाळा................स्वच्छंदी.

2. येथेच............... घ्या धडे!

3. ............ फुलांचा बाग जसा आनंदी

## IV. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

1. कवीला शाळेचा लळा का लागला आहे?

2. शाळेला धन्य असे का म्हटले आहे?

## V. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

1. शाळेत गुरुजन कशाकशाचे धडे देतात?

## VI. संदर्भासह स्पष्टीकरण करा.

1. 'ही आवडते मज मनापासून शाळा'

2. हे प्रेम कराया किती भोवती भाऊ। हातांत घालुनी हात तयांच्या राहू ।।

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## भाषाभ्यास

## 1. समानार्थी शब्द लिहा.

बाग, लळा, शिक्षण, बंधू ,

देश, शाळा, शिक्षक, हात,

धडा, फूल, सुरेख

## 2. विरुद्धार्थी शब्द लिहा.

आवड, विद्या, भाऊ, आनंदी, ज्ञान,

खालील वर्तुळातील शब्द कवितेतील शब्दांना समानार्थी व विरुद्धार्थी शब्द आहेत ते शोधून लिहा.

| | |
|---|---|
| उद्यान, आवड, विद्या, भाऊ,<br>राष्ट्र, विद्यालय, गुरुजी, कर,<br>पाठ, पुष्प, सुंदर | हात, फूल, नावड, अविद्या,<br>सावत्र, बाग, दु:खी, अज्ञान,<br>शिक्षक, कुरूप |

**3) अलंकार ओळखून लक्षण सांगा.**

‘लावीते लळा ही जसा माऊली बाळा’

**उपक्रम :**

1. धडपडणारी मुले हे साने गुरुजींचे पुस्तक वाचा.
2. माझी आवडती शाळा या विषयावर निबंध लिहा.
3. तुमच्या शाळेतील वर्ग शिक्षक किंवा विषय शिक्षकांची मुलाखत घ्या.

@YTBS NOT TO BE REPUBLISHED

4

# किती तरी दिवसात

बा. सी. मर्ढेकर

W9I7L3



**परिचय:-** बा.सी. मर्ढेकर - बाळ सीताराम मर्ढेकर (1909 - 1956) मराठी नवकाव्याचे प्रणेते. त्यांनी कवितेला नवे वळण दिले आणि मराठी कविता समृद्धकेली. 'शिशिरागम', 'काही कविता' व 'आणखी काही कविता' हे काव्यसंग्रह.' मर्ढेकरांची कविता' या संग्रहात त्यांच्या सर्व कवितांचा समावेश केला आहे. याशिवाय 'नटश्रेष्ठ आणि चार संगीतिका', 'सौंदर्य आणि साहित्य' ही पुस्तके; 'पाणी', 'तांबडी माती' या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत.

कवींनी महानगरात वास्तव्य केल्यामुळे बऱ्याच दिवसात त्यांना आपल्या गावी जाता न आल्यामुळे त्यांचे मन गावाकडच्या आठवणीने व्याकुळ झालेले आहे हे या कवितेत व्यक्त झालेले आहे. 'मर्ढेकरांची कविता' या कवितासंग्रहातून कविता घेतलेली आहे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**(मूल्य : आत्मचिंतन)**



किती‌तरी दिवसात
नाही चांदण्यात गेलो;
किती‌तरी दिवसात
नाही नदीत डुंबलो.

खुल्या चांदण्याची ओढ
आहे माझी ही जुनीच;
आणि वाहत्या पाण्याची
शील ओळखीची तीच.

केव्हातरी चांदण्यात
पुन्हा जाईन निर्भय;
गावाकाठच्या नदीत
होईन मी जलमय.

आज अंतरात भीती
खुल्या चांदण्याची थोडी;
आणि नदीचा प्रवाह
अंगावर काटा काढी.

बरा म्हणून हा इथे
दिवा पारवा पाऱ्याचा;
बरी तोतऱ्या नळाची
शिरी धार, मुखी ऋचा.

**शब्दार्थ :-** चांदणे - चंद्रप्रकाश; ताऱ्यांचा प्रकाश, डुंबणे - पोहणे, ओढ - आकर्षण; कल, शीळ - शिटी; आवाज, निर्भय - न भिणारा, जलमय - पाण्याने भरलेला, प्रवाह - ओघ; वाहणे, अंगावर काटा येणे - भीती वाटणे, पारवा - कबुतर, कबुतरच्या रंगाचा, पारा - एक पातळ खनिज पदार्थ, शिरी - डोक्यावर, ऋचा - वेदात दिलेले मंत्र किंवा श्लोक.

**सारांश :-** कवीचे बालपण खेडेगावात गेलेले असून नोकरी निमित्त महानगरात वास्तव्य करत आहेत. बरेच दिवस आपल्या गावी गेलेले नाहीत. अशाच एका सायंकाळी घरात खिडकीसमोर बसलेले असताना त्यांना आपल्या गावाकडची आठवण येते. गावाकडील बालपणाचा भूतकाळ डोळ्यासमोर उभा राहतो आणि वाटते आपण कितीतरी दिवसात शुभ्र चांदण्यात फिरलो नाही. कितीतरी दिवसात नदीत येथेच्छ पोहलो नाही. चांदण्याचा आणि पोहण्याचा आनंद घेतला नाही.

आकाशात असणाऱ्या चांदण्याची ओढ तर बालपणापासूनच आहे. नदीओढयाचे वाहणारे पाणी त्याचा असणारा नाद (शीळ) ही तर ओळखीतील आहे.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

कवीला वाटते केव्हातरी निर्भयपणे शुभ्र चांदण्यात फिरेन, चांदण्याच्या सौंदर्याचा आस्वाद घेईन. गावाकडच्या नदीत मनसोक्त पोहण्याचा आनंद घेईन. असा आशावाद त्याने व्यक्त केला आहे.

पण आता वय झाल्यामुळे खुल्या चांदण्यात फिरण्याची थोडीशी भीती वाटते आहे. नदीच्या वाहत्या प्रवाहात पोहायचे म्हटले तर आज अंगावर शहारा येत आहे.

राहत्या घरातला बल्बचा प्रकाश आणि नळातून येणारी तोतरी धार डोक्यावर घेत तोंडातून मंत्र पुटपुटणे आता बरे वाटत आहे.

## स्वाध्याय

### I. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

1. कवी कितीतरी दिवसात कोठे गेला नाही ?
2. कवीला कोणती जुनी ओढ आहे ?
3. कवीला कशाची शीळ ओळखीची आहे ?
4. चांदण्यात फिरताना आज कवीला काय वाटत आहे ?
5. कवीला कशामुळे अंगावर काटा आलेला आहे ?

### II. दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा.

1. कवीला कोण कोणत्या गोष्टीची आज भीती वाटत आहे ?
2. कवी शहरात राहतात हे कोणत्या ओळीवरून स्पष्ट होते ते लिहा.
3. कवीला वर्तमानकाळात काय वाटत आहे ?

### III. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

1. ग्रामीण जीवन व शहरी जीवन या कवितेच्या आधारे स्पष्ट करा.
2. कवीने नळाला तोतरा का म्हटले आहे?
3. कवींने या कवितेतून आपल्या मनाची समजूत कशी घातली?

### IV. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

1. कितीतरी दिवसात नाही --------------------- गेलो.
2. खुल्या --------------------- ओढ आहे माझी ही जुनीच

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

3. केव्हातरी चांदण्यात पुन्हा जाईन ----------------------

4. आज अंतरात भीती, खुल्या ---------------------- थोडी

5. गावाकडच्या नदीत होईन मी --------------------

**V. संदर्भासह स्पष्टीकरण लिहा.**

1. केव्हातरी चांदण्यात पुन्हा जाईन निर्भय.

2. कितीतरी दिवसांत नाही नदीत डुंबलो

3. बरी तोतऱ्या नळाची शिरी धार, मुखी ऋचा.

## भाषाभ्यास

**अ) खालील शब्दांसाठी कवितेत आलेले शब्द लिहा.**

आवड, पोहणे, शिटी (आवाज), ओव्या, डोके

**आ) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा.**

अंगावर काटा येणे, जलमय होणे, निर्भय होणे

**उपक्रम**

1. गावाकडील निसर्गवर्णन लिहा.

2. माझा गाव या विषयावर निबंध लिहा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# 5 गवतफुला रे ! गवतफुला !

इंदिरा संत

L6X1S7



**परिचय:-** इंदिरा नारायण संत (1914 – 2000) स्त्रीमनाचा हळूवारपणा व्यक्त करणाऱ्या कवयित्री. 'शेला', 'मेंदी','मृगजळ', 'रंगबावरी','बाहुल्या', 'गर्भरेशीम' इत्यादी कवितासंग्रह तसेच 'अंगत पंगत' 'गवतफुला' 'मामाचा वाडा' हे बालकवितासंग्रह प्रसिद्ध 'श्यामली', 'कदली' आणि 'चैतू' हे कथासंग्रह प्रसिद्ध. बेळगावतील नामवंत कवयित्री म्हणून सर्वांना परिचित आहेत.

या कवितेत कवयित्रीने माळावर फुललेल्या गवतफुलाचे वर्णन व त्याचा लागलेला लळा याचे वर्णन केले आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**(मूल्य – आनंद, निसर्गप्रेम)**

रंगरंगुल्या, सानसानुलया, गवतफुला रे गवतफुला !
असा कसा रे मला लागला,सांग तुझा रे तुझा लळा !

मित्रासंगे माळावरती, पतंग उडवित फिरताना
तुला पाहिले गवतावरती, झुलता झुलता हसताना,
विसरून गेलो पतंग नभिचा, विसरून गेलो मित्राला
पाहुन तुजला हरखून गेलो, अशा तुझ्या रे रंगकळा !

हिरवी नाजुक रेशिम पाती, दोन बाजूला सळसळती
नीळनिळूली एक पाकळी, पराग पिवळे झगमगती,
तळी पुन्हा अन् गोजिरवाणी, लाल पाकळी खुलली रे
उन्हामधे हे रंग पाहता, भान हरपुनी गेले रे !



वारा घेउन रूप सानुले, खेळ खेळतो झोपाळा
रात्रहि इवली होऊन म्हणते, अंगाईचे गीत तुला,
मलाहि वाटे लहान होऊन, तुझ्याहूनही लहान रे
तुझ्यासंगती सदा रहावे, विसरून शाळा, घर सारे!

तुझी गोजिरी शिकून भाषा, गोष्टी तुजला सांगाव्या
तुझे शिकावे खेळ आणखी, जादू तुजला शिकवाव्या,
आभाळाशी हट्ट करावा, खाऊ खावा तुझ्यासवे
तुझे घालुनी रंगित कपडे, फूलपाखरां फसवावे !

**कठीण शब्दार्थ :-** सानुला - लहान, लळा - जीव, नभ - आकाश, हरखणे - आनंदित होणे, पराग - फुलातले रजःकण, गोजिरवाणे - सुंदर, देखणे, हट्ट करणे - आग्रह करणे, भान हरपणे - शुद्ध हरपणे, रात्र - रजनी, निशा

**कवितेचा भावार्थ :-** रंगरंगुल्या सानसानुल्या असे असणाऱ्या गवतफुलाचा मुलाला लळा लागलेला आहे. तुझा लळा कसा लागला हे मला सांगशील का? मित्रासोबत माळावरती पतंग उडवीत फिरताना तुला पाहिले माळावरल्या गवतावरती झुलता झुलता हसताना हे पाहून माझ्या हातातला नभात गेलेला पतंग तो उडविण्याचे मी विसरून गेलो. माझ्यासोबत पतंग उडविणारे मित्र होते त्यांनाही विसरून गेलो. गवतफुला तुझ्या रंगछटा पाहून स्वतःलाच विसरून गेलो.

गवतफुला तुझी असणारी हिरवी नाजूक रेशीम पाती दोन बाजूला वाऱ्याने सळसळत आहेत. निळी असणारी एक पाकळी त्यातील पिवळे पराग झगमगत आहेत .आणि पातीच्या खाली एक गोजिरवाणी लाल पाकळी फुललेली आहे. हे सर्व तुझे रंग उन्हामध्ये पहात असताना मी भान हरपून गेलो आहे.

वारा येऊन गवतफुलाबरोबर झोपाळ्याचा खेळ करत आहे. तर रात्र लहान होऊन तुला अंगाई गीत गात आहे मला वाटते तुझ्यापेक्षाही लहान व्हावे, तुझ्यासोबत कायम हावे शाळा, घर सर्व सारे विसरून तुझ्यासोबत रहावे.

गवतफुला तुझी गोजिरी भाषा शिकून घ्यावी आणि तुझ्याच भाषेत गोष्टी सांगाव्यात, तुझे खेळ शिकावे आणि माझ्याजवळ असणारी जादू तुला शिकवावी. आभाळाशी हट्ट करावा आणि तुझ्यासोबत खाऊ खावा तुझे रंगीत कपडे परिधान करावेत आणि फुलपाखरांना फसवावे.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

# स्वाध्याय

**I. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

1. या कवितेतील मुलगा कोणाशी संवाद साधत आहे ?
2. या कवितेतील आलेल्या यमकाच्या जोडया सांगा ?
3. गवतफुलाची भाषा कशी आहे ?
4. मुलाला गवत फुलाचा लळा का लागला ?
5. अंगाई गीत कोण गात आहे ?

**II. खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उतरे लिहा.**

1. कवितेतील मुलाची गवतफुलाशी कुठे व कशी भेट झाली ?
2. गवतफुलाला पाहून मुलगा कोणकोणत्या गोष्टी विसरला ?
3. कवयित्रीने गवतफुलाच्या पानांचे व पाकळ्यांचे वर्णन कसे केले आहे ?
4. गवतफुलाला लहान होऊन कोण कोण भेटायला आले आहे ?
5. गवतफुलासोबत राहून मुलाला कोणकोणत्या गोष्टी करायच्या आहेत ?

**III. खालील प्रश्नांची पाच सहा ओळीत उत्तरे लिहा.**

1. निसर्गातील कोणकोण गवतफुलाशी खेळायला येतात ? त्यांचे कोणकोणते खेळ चालतात ?
2. मुलाचे भान केव्हा हरपते ? गवतफुलाबरोबर सतत रहावे असे मुलाला का वाटते?

**IV. खालील दिलेल्या अर्थाच्या कवितेतील ओळी शोधा.**

1. तुझे रंग पाहून मी स्वतःला विसरून गेलो.
2. मला तुझ्यापेक्षाही लहान व्हावेसे वाटते.
3. तुझी गोजिरी भाषा शिकून तुला गोष्टी सांगाव्या.
4. तुझ्यासारखे रंगरूप घेऊन फुलपाखरांना फसवावे.

**V. या कवितेत गवतफुलाचे वर्णन करताना कोणाला कोणते रंग वापरले आहेत ते लिहा.**

उदा., रेशिम - पातीहिरवी

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

2) पाकळी -

3) पराग -

4) तळिची पाकळी -

**खेळूया शब्दाशी**

आ) समान अर्थाचे शब्द लिहा.

| गीत | रात्र | आभाळ | वारा |
|---|---|---|---|
| | | | |

**गवतफुलाचे वर्णन करणारे शब्द शोधून आकृतीत लिहा.**




@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**उपक्रम -** एखाद्या माळरानावर फिरताना तुम्ही गवतफुले पाहिली आहेत का ? ती कोणकोणत्या रंगाची असतात? तुम्ही पाहिलेल्या गवतफुलाचे चित्र काढा व रंगवा.

तुम्हाला फुलपाखरू भेटले तर तुम्ही त्याच्याशी काय संवाद साधाल? तुमच्या शब्दात लिहा.

# पूरक वाचन

# 1 वळणं येत गेली ...!

**नारायण सुर्वे**



**परिचय:-** नारायण गंगाराम सुर्वे (1926 - 2010) 'ऐसा गा मी ब्रह्म', 'माझे विद्यापीठ', 'जाहीरनामा', 'पुन्हा एकदा कविता', 'सनद'हे त्यांचे कवितासंग्रह. 'ऐसा गा मी ब्रह्म'ला. राज्य सरकारचा पुरस्कार मिळाला.साहित्य क्षेत्रातील योगदानासाठी यांना इ.स. 1998 चा पद्मश्री पुरस्कार देण्यात आला.यांच्यावरती मार्क्सवादी विचारांचा पगडा होता. आपल्या लेखणीतून त्यांनी समाज परिवर्तनाची कवने लिहिली. 1995 मध्ये परभणी येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थान सुर्वे यांनी भूषविले होते. अनेक आंतरराष्ट्रीय संमेलनांमध्ये, परिषदांमध्ये सुर्वे सहभागी झाले आहेत. त्यांच्या कवितांचे अन्य अनेक भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत. कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा जनस्थान पुरस्कार (इ.स. 2004), मध्यप्रदेश सरकारचा कबीर पुरस्कार,पद्मश्री पुरस्कार (इ.स. 1998), सोव्हिएत रशियाचं नेहरू ॲवॉर्ड.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

'मी कोण होणार?' किंवा 'मला कोण व्हावंसं वाटतं?' हा प्रश्न मला कधी पडलाच नाही. कारण कळायला लागलं तेव्हापासून भाकरीचा प्रश्न माझ्यापुढे होता. जन्मल्यापासून माझं जीवन उघडलेल्या पुस्तकासारखं होतं आणि आजही ते तसंच आहे.

माझ्या जन्मदात्या आई-वडिलांविषयी मला काही माहिती नाही. मी कुणाचा मुलगा आहे, माझे आई-वडील कोण आहेत, कोण होते हेही मला माहीत नाही. अजाणत्या वयात मुंबईच्या फूटपाथवर कुणीतरी मला टाकून दिलं होतं. आवारा मुलासारखं भटकणं हेच माझ्या हातात होतं. त्याच वेळेस गंगाराम कुशाजी सुर्वे या गिरणी कामगाराने मला त्याच्या घरी नेलं. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा तर त्यानं पुरवल्याच. परंतु त्याचबरोबरच त्यानं मला एक नाव दिलं. एका हाडामासाच्या गोळ्याचं 'नारायण सुर्वे' असं नामकरण झालं. गंगाराम सुर्वेच्या रूपानं मला एक पिता मिळाला. त्यांची पत्नी काशीबाई माझी आई झाली.

या दोघांनी माझ्यावर खूप प्रेम केलं. त्यांना एक मुलगी होती. तिच्या बरोबरीनं त्यांनी मला वाढवलं. तेव्हा आम्ही माहिमला राहात होतो. ती दोघंही मिलमध्ये काम करायची. सकाळी सहापासून संध्याकाळी सहापर्यंत बारा तास ते राबत असत. घरच्या गरिबीमुळे मिलपर्यंत ते चालत जात. हालअपेष्टांचं जीवन जगूनही, त्यांनी आम्हाला कसलीही कमतरता पडू दिली नाही.

त्यांच्या आग्रहामुळे मी शाळेत जाऊ लागलो. माझ्या उंचीप्रमाणे माझ्या वयाचा अंदाज लावण्यात आला. चौथीपर्यंत मी त्याच शाळेत शिकलो. त्याच वेळेस काय झालं ते कळलं नाही. आई-वडिलांची नोकरी गेली. त्यामुळे आमच्या कुटुंबाला खूप हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. आर्थिक विवंचनेमुळे मुंबई सोडण्याचा निर्णय त्यांनी घेतला. जाताना माझ्या हातात दहा रुपये ठेवून म्हणाले, "तुझं आयुष्य आता तुझ्या हातात आहे. आम्ही आता जातो. आपली सोबत इथपर्यंतचीच होती.' असं म्हणून ते गावी निघून गेले.

मी बारा-तेरा वर्षांचा असेन तेव्हा हसण्या-बागडण्याच्या वयात पुन्हा एकदा मी रस्त्यावर आलो. अशा वयात उद्या काय व्हायचं त्याचं स्वप्न पाहायचं तरी कसं? "कोण होणार?' यापेक्षा जगण्यासाठी काहीतरी होणंच महत्त्वाचं होतं ! त्यामुळे त्याच दिशेनं माझा प्रवास सुरू झाला.

बारा-तेरा वर्षांचं वय अजाण असलं तरी परिस्थितीनं परिपक्व बनवलं. मिळेल ते काम करणं मी सुरू केलं. घरगडी, गोदामधील हमाली, बूटपॉलीश करणं, घोडयाला नाल लावणाऱ्याला मदत करणं, अशी पडेल ती कामं केली. त्या वयात स्वप्नं कधी पडलीच नाहीत. कारण दिवसभराच्या श्रमानंतर रात्री जिन्याखाली गोणपाटावर अंग टाकल्यावर झोप यायची. या परिस्थितीत स्वप्नं म्हणजे काय हे मला माहीतच नव्हतं. मला कोण व्हायचं होतं किंवा मी कोण होणार हा मुद्दा गौणच होता. कारण मी ज्या समाजात राहत होतो, तो समाज मला काय बनवणार हे महत्त्वाचं होतं.

या कष्टांच्या दिवसात माझी वाचनाची आवड मात्र कायम होती. त्या वाचनाने मी घडत गेलो. त्याचेच संस्कार माझ्यावर झाले. आई-वडिलांची उणीव भरून निघाली नाही, पण मन संस्कारित झालं.

पुढं स्वतंत्रता आंदोलनातही भाग घेतला. सोनी बाटलीवालासारख्या नेत्यामुळे मी खादीचा शर्ट, निळी पँट घालण्यास सुरुवात केली आणि पीपल्स व्हॉलंटरी ब्रिगेडचा बॅच लावून, गोवालिया टँकपर्यंत पदयात्रा केली. मुलांना बरोबर घेऊन गांधी-नेहरूंची भाषणं ऐकावी. लाठीमाराला सामोरं जाणं हे तर माझ्यासाठी नित्याचच होतं. या चळवळीच्या दरम्यान मला कोहिनूर मिलमध्ये नोकरी मिळाली. मिलमधील नोकरीमुळे कामगार संघटनांशी जोडलो गेलो. इथेच माझी ओळख मार्क्सवादाशी झाली. मिलमधील नोकरीमुळे थोडी आर्थिक स्थिरता आली. परंतु असं वाटत असतानाच मिलमध्ये संप झाला. माझ्या काही मित्रांच्या मदतीनं नवीन नोकरी मिळायची, पण काही कारणांमुळे ती सुटायची.

हे चालू असताना अभ्यासही चालू होता. हातात जे मिळायचं ते वाचून काढण्याचा सपाटा मी लावला होता. तरी शाळा मागेच राहिली होती. 1936 पासून 1944 पर्यंत शाळेचं तोंडही मी पाहिलं नव्हतं. त्याच वर्षी एका म्युनिसिपल शाळेत मला शिपायाची नोकरी मिळाली. 1949 च्या आसपास माझा प्रेमविवाह झाला. ती सुद्धा त्याच शाळेत शिपायाची नोकरी करत होती. तिच्या आग्रहामुळे मी पुन्हा शिक्षण घ्यायचा निर्णय घेतला. भायखळ्याच्या नाईट स्कूलमध्ये प्रवेश घेऊन 'व्हर्नाक्युलर फायनलची परीक्षा पास झालो. हे व्हायला 1957 साल उजाडलं.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

1954 साल उजाडेपर्यंत मी एकही कविता केली नव्हती. साहित्यात मला रस होता. परंतु साहित्यातील कुठल्या अंगाकडे माझा कल आहे ते मला पाहायचं होतं. कथा-कादंबरी, ललित लेखनापेक्षा माझा कल कवितेकडे होता हे माझ्या ध्यानात आलं. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात माझ्या वेडाला खतपाणी मिळालं. त्या वेळच्या नाटकगृहात माझं जाणं येणं होतं, त्याच वातावरणात मी माझी पहिली कविता लिहिली.

डोंगरी शेत माझं, मी बेनू किती ? शाहीर अमर शेखजींनी त्यांच्या बुलंद आवाजात ही कविता गायली. लोकांनाही माझं हे गीत आवडलं. एच. एम. व्ही. ने या गाण्याचं ध्वनीमुद्रण केलं. त्यांनी मानधन म्हणून मला 15 रुपये दिले या गीताने माझा आत्मविश्वास वाढला.

कवितेच्या क्षेत्रात मी काहीतरी करू शकतो असं वाटू लागलं. प्रत्येक पावलावर मी माझीच परीक्षा घेत होतो. आत्मपरीक्षण करत होतो. 'डोंगरी शेत' नंतर मी काही कथाही लिहिल्या. त्या छापून येऊ लागल्या. त्यानंतर मी एक कविता लिहिली- 'शहीद हो ।' 105 हुतात्म्यांच्या बलिदानावर ती कविता आधारित होती. त्याच वेळेस 'नवयुग' साप्ताहिकात माझी एक कविता प्रसिद्ध झाली.

'भाकरीचा चंद्र शोधण्यात आयुष्य बरबाद झालं'. या कवितेमुळं नामवंत समीक्षकांनी माझी दखल घेतली. 'नारायण सुर्वे' या नावाला वलय निर्माण झालं. मी कधी स्वप्नातही विचार केला नव्हता की, मी साहित्य संमेलनाचा अध्यक्ष होईन किंवा कवी होईन. मला फक्त चांगला माणूस म्हणून जगायचं होतं आणि लोकांना जगवायचं होतं. पण शेवटी आपल्या हातात असतं तरी काय? जगण्यासाठी संघर्ष करत मी स्वतःला घडवत गेलो. कोण होणार होतो आणि कोण झालो हा मुद्दा आज विचारात घेतो, तेव्हा मात्र एकच एक उत्तर मिळत नाही. आयुष्यात एक एक वळणं येत गेली आणि मी निश्चिंतपणे त्या वळणांवरून पुढे जात राहिलो. बस्स याच प्रवासात आजचा दिवस उजाडला.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

2

# खरा दागिना


**सुधा मूर्ती**

**अनुवादक : लीना सोहोनी**




**परिचय:-** सुधा मूर्ती (जन्म 1950) यांचा जन्म कर्नाटकातील हावेरी जिल्ह्यातील शिग्गाव येथे झाला. यांनी कॉम्प्युटर सायन्स विषयांतील एम. टेक ही पदवी प्राप्त केली असून त्या सध्या 'इन्फोसिस फाऊंडेशन' च्या अध्यक्षा आहेत. त्या विख्यात सामाजिक कार्यकर्त्या आणि कुशल लेखिका आहेत. कर्नाटकातील सर्व सरकारी शाळांना संगणक आणि ग्रंथालय सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या चळवळीच्या त्या प्रणेत्या आहेत. 2004 मध्ये त्यांना 'राजलक्ष्मी' पुरस्कार मिळाला. 2006 मध्ये भारत सरकारतर्फे 'पद्मश्री' पुरस्काराने त्यांनासन्मानीत करण्यात आले. त्यांना सहा 'डॉक्टरेटस्' मिळाल्या आहेत. त्यांच्या सात कादंबऱ्या, चार तंत्रज्ञानविषयक पुस्तके आणि तीन प्रवासवर्णने ही त्यांची साहित्य संपदा आहे. 'द न्यू संडे एक्सप्रेस' या इंग्रजी वृत्तपत्रातून 'द वीक' या साप्ताहिकातून त्यांनी वेळोवेळी आपले अनुभव लेखरुपाने मांडले. प्रस्तुत कथा 'गोष्टी माणसांच्या' या कथासंग्रहातील आहे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

कर्नाटकातील दक्षिण कॅनरा हा जो जिल्हा आहे, तो फारच आगळावेगळा आहे. येथे साक्षरतेचं प्रमाण फार मोठं आहे. येथील लोक उद्यमशील आहेत, कष्टाळू आहेत. कामाच्या शोधात ते जगभर जाऊन पोहोचले आहेत. आपल्याला भारतात किंवा जगाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात एखादं उडप्याचं हॉटेल दिसलं, तर ते हमखास या दक्षिण कॅनरामधल्याच कोणीतरी चालू केलेलं असणार.

इन्फोसिस फौंडेशनचा एक उपक्रम आहे. 'प्रत्येक शाळेसाठी वाचनालय.' या उपक्रमांतर्गत आम्ही बऱ्याच वेळा सरकारी शाळांना पुस्तकरूपाने देणगी देत असतो. म्हणजे मग त्या शाळेत शिकणाऱ्या मुलामुलींना अगदी लहान वयातच वाचनासाठी पुस्तकं उपलब्ध होतात. यासाठी मी प्रचंड प्रवास करते, विशेषतः खेडोपाडयात आणि कन्नड भाषेत लिहिलेली विविध विषयांवरील पुस्तकं खेडयांमधील शाळांना देणगी म्हणून देते. या प्रवासामुळेच वेगवेगळया भागात राहणाऱ्या मुलांना नेमकं काय वाचायला आवडतं, हे आता मला नीट समजू लागलं आहे. या प्रवासात मला अनेकदा वेगवेगळया लोकांच्या घरी जाऊन उतरण्याची वेळ येते, कारण मी ज्या गावांना, ज्या खेडयांना भेटी देते, ती इतकी छोटी असतात, की तेथे हॉटेल्सही नसतात. साधारणपणे मी गावातील शाळेला भेट देणार असले, तर त्याच शाळेतील शिक्षकांपैकी कोणाच्यातरी घरी जाऊन मी उतरते. कधी कधी तर काही लोकांना मी त्यापूर्वी कधी पाहिलेलंसुद्धा नसतं, अशांकडे जाऊन मला राहण्याची वेळ येते.

भारतात पाहुण्यांचं स्वागत अत्यंत प्रेमाने, आदराने आणि सन्मानाने केलं जातं. संस्कृत भाषेत एक वचन आहे, 'अतिथी देवो भव' जेव्हा पाहुणा आपल्या घरी येतो, तेव्हा त्याच्या रूपाने देवच आपल्या भेटीला येतो.

मी आजवर जेव्हा जेव्हा खेडयात कोणाकडे जाऊन राहिले आहे, तेव्हा तेव्हा मला या गोष्टीचा प्रत्यय आलेला आहे. अठरा विश्वे दारिद्रय असलेल्या घरातून मी विलक्षण प्रेमाचा अनुभव घेतला आहे. मी कोण आहे हे माहीतही नसताना त्यांनी माझं अत्यंत आपुलकीनं स्वागत केलेलं आहे आणि तेही माझ्याकडून त्या मोबदल्यात कसलीही अपेक्षा न ठेवता !

मी अशीच एका शाळेच्या समारंभासाठी दक्षिण कॅनरामधील एका खेड्यात गेले होते. ते पावसाळ्याचे दिवस होते. ते छोटंसं खेडं अरबी समुद्राच्या किनारी वसलेलं होतं. मुसळधार पाऊस कोसळत होता आणि गावात हॉटेल्स नव्हती. शाळामास्तर अविवाहित होते. ते एक लहानशी खोली घेऊन राहत असत. ते मला म्हणाले,

"मॅडम, या शाळेचे जे चेअरमन आहेत, ते एक अत्यंत सज्जन गृहस्थ आहेत. त्यांनी असा निरोप पाठवलाय, की आजच्या रात्री तुम्ही त्यांच्या घरी राहिलात तरी चालेल. या पावसात आज काही तुम्हाला प्रवास करणं शक्य होणार नाही. पुलाचा रस्ता पावसामुळे पाण्यात बुडलेला आहे."

माझ्यासमोर दुसरा काही पर्याय नव्हता. अगदी परक्या माणसांच्या घरी जाऊन उतरणं मला जरासं अवघड वाटत होतं. एवढयात स्वतः चेअरमन श्री. ऐथप्पा छत्री घेऊन मला न्यायला आले.

त्यांचं घर चांगलं भलंमोठं होतं. ते उपयुक्ततेच्या दृष्टिकोनातून बांधलेलं होतं. विशेष सजावट वगैरे केलेली नव्हती. घरात कोठीची खोली होती. घरचे नारळ आणि भाज्या वगैरे साठवण्यासाठी स्वतंत्र जागा होती. घरात लाल रंगाची फरशी होती. दक्षिण कॅनरामध्ये जशी जुनी घरं बघायला मिळतात, अगदी तसंच ते चौसोपी घर होतं. घराच्या मधोमध मोठं अंगण होतं. स्वयंपाकघराच्या बाहेरच विहीर होती. रोजच्या वापरासाठी त्यातूनच पाणी शेंदून आणावं लागे. मागच्या बाजूला गोठा होता, शिवाय भाज्यांचा मळा होता. अंधार झाला होता, त्यामुळे मला याहून जास्त काही दिसू शकलं नाही. पावसाचे मोठमोठे थेंब पावलांवर येऊन आदळत होते, त्याचा चांगलाच मार बसत होता.

मी घरात शिरले आणि त्या घरातील गृहिणी आमच्यासाठी टॉवेल घेऊन आली. तिचा चेहरा हसरा, प्रसन्न होता. त्यामुळे मला एकदम बरं वाटलं, अवघडलेपणा कमी झाला. फारशी प्रस्तावना न करता ती म्हणाली, "अगदी मोकळेपणाने बसा हो. जेवण एवढयात तयार होईलच."

मी कपडे वगैरे बदलून जेवणघरात आले. एवढया मोठया प्रशस्त जेवणघरात आम्ही चौघंच माणसं होतो, मी, ते दोघं पती-पत्नी आणि त्यांची म्हातारी आई. आम्ही जमिनीवरच बसलो. जेवायला केळीची पानं मांडली होती. त्यांच्या स्वयंपाक्यानं आम्हाला वाढलं, जेवणाचं पान विविध प्रकारच्या पदार्थांनी भरलं होतं.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

कशापासून सुरुवात करावी, तेच कळेना. त्या म्हाताऱ्या आजीबाई फार प्रेमळ आणि कनवाळू होत्या. त्यांना पाहून माझ्या आजीची आठवण झाली मला. तीसुद्धा अशीच सहृदय होती. जेवणानंतर मला त्या आजींशी गप्पा मारायच्या होत्या. मी त्यांना तसं सांगताच त्या म्हणाल्या, "मग पाहिजे तर आज तुम्ही माझ्याच खोलीत झोपा. म्हणजे आपल्याला गप्पा मारता येतील." मलासुद्धा पहिल्या मजल्यावरच्या खोलीत एकटीनं झोपण्यापेक्षा ही कल्पना जास्त पसंत पडली.

कर्नाटकातील इतर जिल्ह्यापेक्षा या दक्षिण कॅनरा भागातील लोक इतके जास्त सुशिक्षित कसे काय, असा प्रश्न मला नेहमीच पडत असे. मी कुट्टाम्मांना विचारलं, "तुम्ही लहान होता, तेव्हा शाळा शिकलात का ?" त्यावर कुट्टाम्मांनी एक सुस्कारा सोडला... खूप दुःख झाल्यासारखा!

"दुर्दैवाने मी शाळेत गेले नाही. मी जेव्हा लहान होते तेव्हा आमची खूप गरिबी होती. मी एका शिक्षकांच्या घराच्या बगीच्यात मोलाने काम करायची. शिक्षण हे अत्यावश्यक असतं, असं मला नेहमीच वाटायचं. आपल्याला जर लिहिता-वाचता येत असेल, तर आपल्याला चांगलं काम मिळू शकतं; पण माझ्या बाबतीत ते शक्यच नव्हतं. त्यामुळे पुढे मी एकच निश्चय केला, आपला एकुलता एक मुलगा ऐथप्पा याला आपण खूप शिकवायचं, अगदी त्याला पाहिजे तेवढं शिकवायचं. त्यासाठी आपण लागेल तेवढे परिश्रम करायचे. माझ्या यजमानांनाही तसंच वाटत होतं. पण आमचा मुलगा केवळ पाच वर्षांचा असताना माझ्या यजमानांना सर्पदंशामुळे मृत्यू आला. 'मी आपल्या मुलाला शिकवीन,' अशी शपथ मी त्या वेळी घेतली."

साठ वर्षापूर्वीचं आयुष्य कसं असेल याची मी मनाशी कल्पना करू लागले. तेव्हाचं सामाजिक दडपण, अठराविश्वे दारिद्र्य, सरकारकडून काहीच मदत नाही. मला त्या काळच्या अनेक स्त्रिया भेटल्या आहेत. सर्वांची कहाणी ही साधारण अशाच प्रकारची आहे. कुट्टम्मांनी आपली कहाणी पुढे सांगितली,

"माझ्या मुलाने सुद्धा माझी निराशा नाही केली. तो मुंबईला जाऊन हॉटेलात पोऱ्या म्हणून कामाला लागला. तो सकाळी बशा विसळायचा आणि रात्री 'मोघावीरा नाईट स्कूल'मध्ये जाऊन शाळा शिकायचा." "हो, हो. मला माहीत आहे ती शाळा. ती वरळीला आहे. मुंबईतील ती सर्वांत जुनी कन्नड शाळा आहे. अनेक मुलं तिथे शिकली आहेत."

"त्याचं शाळेचं शिक्षण संपल्यावर त्याला एका हॉटेलच्या काऊंटरवर कारकुनाची नोकरी लागली. तो नाईट कॉलेजात जाऊ लागला. त्याने पदवी प्राप्त केली आणि नंतर मुंबईत स्वतःचं हॉटेल काढलं. त्यात त्याची फार चांगली भरभराट झाली. " "मग ते आता इथे कसे काय असतात ?" त्यावर कुट्टम्मा मंदशा हसल्या. त्यांचा चेहरा मुलाविषयीच्या अभिमानाने उजळून निघाला होता. "त्याने मुंबईत पुढे आणखी अनेक हॉटेल्स काढली; पण मी मात्र इकडेच राहिले. त्याच्यापाशी इतका पैसा असूनही माझं मन मुंबईत कधीच रमलं नाही.

कारण मला माझी भाषा प्रिय आहे."

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

"हो. मला माहीत आहे ते. संस्कृतमध्ये एक सुभाषित आहे- 'जननि जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसि' त्याचा अर्थ असा, की आपली मातृभूमी ही आपल्यासाठी स्वर्गासमान असते. " "तुम्ही खूप शिकलेल्या आहात, तुम्हाला ही सगळी संस्कृत वचनं वगैरेठाऊक आहेत. पण मला मात्र माझ्या अंतर्मनाने कौल दिला आपण इथेच रहायचं आणि आपल्या माणसांसाठी काहीतरी करायचं. माझ्या मुलाने खूप धनसंपत्ती मिळवली; पण आपला व्यवसाय संपूर्णपणे स्वतःच्या मुलाच्या हाती सोपवला. आज माझा मुलगा पासष्ट वर्षांचा आहे. दहा वर्षापूर्वीच तो गावाकडे परतला.

"ते आपला वेळ कसा घालवतात ?" एखाद्या म्हाताऱ्या बाईला आपलं गाव सोडून शहरात जाऊन राहावंसं वाटणार नाही, हे मी समजू शकते. पण ऐथप्पासारख्या इतक्या यशस्वी उद्योजकाने सगळं सोडून निवृत्त होऊन या झोपाळलेल्या गावी येऊन राहणं मात्र मी समजू शकत नव्हते.

"माझ्या मुलानं मला विचारलं, "अम्मा, मी ही एवढी धनदौलत मिळवली; पण आता तुझी काय इच्छा आहे, ते सांग. मी तुझ्या मनाप्रमाणे वागेन. माझ्या कॉलेजची फी भरण्यासाठी तू तुझे दागिने विकले होतेस, त्याची आठवण आहे मला. मला दोन वेळा जेवायला मिळावं, म्हणून तू अर्धपोटी राहत होतीस. आता तुझ्यासाठी पुष्कळ दागिने करणार आहे मी. " "मग त्यावर तुम्ही काय उत्तर दिलंत?"

"मी माझ्या मुलाला म्हणाले, खरा दागिना कोणता, तर माणसाचं शिक्षण. मी लहानपणी ज्या शिक्षकांच्या घरी मजुरीचं काम करत होते, ते मला नेहमी सांगत. या आयुष्यात सर्व काही नाशवंत आहे. फुलं, सौंदर्य, अन्नपदार्थ कोणीही व्यक्ती कायम सुंदर दिसू शकत नाही. पण शिक्षणामुळे मात्र आपल्या चेहऱ्यावर एक प्रकारचा आत्मविश्वास चमकू लागतो व तेच खरंखुरं सौंदर्य.' आता माझं काही दागिने घालायचं वय राहिलं नाही. तुला जर माझी इच्छा पूर्णच करायची असेल, तर आपल्या दक्षिण कॅनरा जिल्ह्यातील खेडोपाडी तुला जेवढया शाळा बांधणं शक्य असेल तेवढया बांध. तेथे मोफत शिक्षणाची सोय कर. माझ्या मुलाला माझ्या भावना कळल्या. त्यानंतर तो स्वतः कायमचा गावी राहायला आला आणि त्याने आतापर्यंत दहा शाळा बांधल्या आहेत.'

त्या भागात साक्षरतेचं प्रमाण एवढं जास्त कसं काय, ते आता मला समजलं. या कुट्टम्मांसारख्या स्त्रिया स्वतः शिकू शकल्या नाहीत; परंतु उत्तम शिक्षणाचं महत्त्व त्यांनी जाणलं होतं. आपल्या मुलांनी शाळेत जाऊन शिक्षण घेतलं पाहिजे, असा आग्रह त्यांनी धरला होता. एक गोष्ट निर्विवादपणे खरी आहे- 'जेव्हा एक पुरुष शिक्षण घेतो तेव्हा केवळ तोच तेवढा सुशिक्षित होतो, पण जर एका स्त्रीने शिक्षण घेतलं, तर तिचं संपूर्ण कुटुंब सुशिक्षित होतं.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

# व्याकरण

## 1 अलंकार

### अर्थालंकार

अर्थालंकार म्हणजे अर्थ चमत्कृतीमुळे भाषेला नाद निर्माण होऊन सौंदर्य प्राप्त होते तेव्हा त्याला अर्थालंकार असे म्हणतात.आपल्याला जे सांगायचे आहे ते प्रभावी रीतीने सांगण्यासाठी त्यासारख्याच दुसऱ्या गोष्टींची आपण मदत घेतो. त्याची तुलना करतो.

**उदा-सुरेशचे अक्षर चांगले आहे.**

हे आपल्याला सांगावयाचे आहे म्हणून आपण 'अक्षरांची' तुलना 'मोत्याशी' करतो आणि वाक्य तयार करतो. 'सुरेशचे अक्षर मोत्यासारखे सुंदर आहे' इथे 'अक्षर' व मोती यांच्यातील साम्य आपल्यासमोर येते यासाठी अनेक उदाहरणे पाहता येतात.

1. शाळा मातेप्रमाणे आहे.
2. आमच्या गावातील पाटील हे कर्णासारखे दानशूर आहेत.
3. आमच्या वर्गातील समीर हा प्रा. शिवाजीराव भोसले यांच्यासारखा चांगला वक्ता आहे.

**उपमा अलंकार :**

दोन वस्तूतील साम्यचमत्कृती पूर्ण रीतीने जेथे वर्णन केलेले असते तेथे उपमा अलंकार होतो. उपमेय एक वस्तू दुसऱ्या वस्तू सारखी आहे असे वर्णन येथे केलेले असते.

**उपमेचे चार घटक असतात.**

1. उपमेय : ज्याची तुलना करायचे ते.
2. उपमान : ज्याच्याशी तुलना करायचे ते.
3. साधारण धर्म - साम्य दाखवणारे शब्द
4. साम्यवाचक शब्द - सम, समान, गत, जेवि, सारखा, सदृष्य, परी, जसा, तसा, प्रमाणे इ.

**उदाहरण**

1. चंद्रासारखे शितल चांदणे पडले होते.
2. मुंबईतील रस्ते शरीरातील नसांप्रमाणे दिसत होते.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

3. सावळाच रंग तुझा पावसाळी नभापरी!

4. आभाळागत माया तुझी आम्हावरी राहू दे!

**उत्प्रेक्षा अलंकार :**

उत्प्रेक्षा म्हणजे 'कल्पना' ज्या दोन वस्तूंची आपण तुलना करतो त्यातील एक (उपमेय) ही जणू काही दुसरी वस्तू (उपमानच) आहे, अशी कल्पना करणे याला उत्प्रेक्षा अलंकार म्हणतात.

साम्यवाचक शब्द – की, कारण की, जणू, जणू काय, भासे, गमे, वाटे इ.

1. ती गुलाबी थंडी म्हणजे स्वर्गच अवतरला जणू !

2. खळखळ वाहत लगबग येती तरिनी गिरीवरती !

   देवदर्शना जणू चालल्या भाविक या तरुणी ll

3. अत्रीच्या आश्रमी | नेले मज वाटे |

   माहेरची वाटे | खरेखुरे |

**रूपक अलंकार :**

उपमेय व उपमान यात एकरूपता आहे. ते भिन्न नाहीत. असे जिथे वर्णन केलेले असते तेथे रूपक अलंकार होतो.

**उदाहरण**

1. प्राप्तकाल हा विशाल भूधर , सुंदर लेणी तयात खोदा, निजनामे त्यावरती नोंदा.

2. बाई काय सांगो | स्वामींची ती दृष्टी | अमृताची वृष्टी | मज होय||

3. लहान मूल म्हणजे मातीचा गोळा. आकार द्यावा तशी मूर्ती घडते.

## भाषाभ्यास

**खालील वाक्यातील अलंकार ओळखून चौकोनात लिहा.**

1. 'त्या मोकळ्या रस्त्यावर हत्तीसारखे धोंडे पडलेले होते' [ ]

2. आरुशचे अक्षर मोत्यासारखे आहे. [ ]

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

3. छ. शिवाजी जणू सिंहच.

4. ती गुलाबी उषा म्हणजे परमेश्वराचे प्रेम जणू.

5. विद्या हे शस्त्र आहे.

6. उठ पुरुषोत्तमा | वाट पाहे रमा | दावि मुखचंद्रमा | सकळिकांसी ||

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

# 2 पत्र लेखन

पत्रलेखन म्हणजे लेखी निरोप होय. सध्या टेलीफोन, भ्रमणध्वनी यांच्या प्रसारामुळे पत्र लेखनाचे महत्त्व कमी होत आहे. पत्र लेखन ही एक कला असून त्याचे तंत्रही तितकेच महत्त्वाचे आहे.

पत्रात पाच महत्त्वाची अंगे सांभाळावी लागतात. ती ठराविक तंत्रानुसार लिहावी लागतात.

1) पत्र लिहिणाऱ्याचा पत्ता व त्या दिवसाची तारीख

2) मायना किंवा संबोधन

3) मजकूर / पत्रातील विषय मांडणी

4) समारोप / शेवट

5) ज्याला पत्र लिहिले आहे त्याचा पत्ता

**पत्र लेखनात दोन महत्त्वाचे प्रकार आहेत.**

1) कौटुंबिक पत्रे 2) सामाजिक / व्यावसायिक पत्रे कौटुंबिक पत्राचे विषय व सामाजिक पत्राचे विषय वेगळे असतात. विषयानुरुप पत्राचा मजकूर कमी जास्त होऊ शकतो. पत्र आटोपशीर पण विषयाचा पूर्ण खुलासा करणारे असावे. विराम चिन्हे योग्य रीतीने द्यावीत. पत्र पाठविणाऱ्याच्या नावावर 'प्रेषक' तर स्वीकारणाऱ्याच्या पत्त्यावर 'प्रति' असे लिहून नाव लिहावे.

पत्र लिहून झाल्यावर पत्र लिहिणाऱ्याच्या लक्षात येते की एखादी महत्त्वाची गोष्टच लिहायची राहिली आहे ती पत्र मिळणाऱ्याशी अगदी जवळची, निगडीत आहे. ती लिहायलाच हवी. मग आपल्या अखेरच्या उजव्या कोपऱ्यातील नावाच्या खाली डाव्या बाजूला ता. क. म्हणजे 'ताजा कलम' असे लिहून आठवलेला मजकूर लिहितात.

नातेवाईकांच्या पत्रातील भाषा घरगुती, मनमोकळी व खेळकर असावी. ज्याला पत्र लिहितो त्याच्याशी खुल्या दिलाने बातचीत करतो आहे असे वाटावे. पत्र वाचताना जणू ती व्यक्ती आपल्याशी बोलते आहे असे वाटावे/असा भास झाला पाहिजे.

मित्राला पत्र लिहिताना भाषा थोडी सलगीची असावी. त्रयस्थ व्यक्तिस लिहावयाचे असेल तर भाषा थोडी रोख-ठोक चालू शकते.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## काही पत्रांचे पूर्वापार चालत आलेले मायने व शेवट.

| अ. नं | व्यक्ती/ कोणास | मायना | शेवट |
|---|---|---|---|
| 1. | आई | ती.सौ. आईस, सा.न. वि. वि. (वडील नसल्यास सौ. लिहू नये) | तुझा /तुझी /आज्ञाधारक, पुत्र/ मुलगी /कन्या, |
| 2. | वडील | ती. बाबांना,/ ती वडिलांचे सेवेशी, कृ. सा.न.वि.वि. | आपला /आपली / आज्ञाधारक, पुत्र /मुलगी / कन्या, |
| 3. | चुलते | ती. स्व. काका/तात्या यांना, | तुमचा पुतण्या / पुतणी, |
| 4. | मोठा भाऊ | ती. स्व.दादा/अण्णा यास, सा.न वि. वि. | तुझा भाऊ/ बहीण, |
| 5. | लहान भाऊ | चि. यास, अनेक शुभाशीर्वाद | तुझा दादा /अण्णा /ताई, |
| 6. | मित्र/ मैत्रीण | प्रिय मित्र/ मैत्रीण, यास / हीस सप्रेम नमस्कार | तुझा मित्र/ तुझी मैत्रीण, |
| 7. | गुरुजी /शिक्षक | मा. गुरुवर्य यांना, सा.न.वि.वि. | आपला /आपली नम्र, |
| 8. | मोठी बहीण | ती. स्व. सौ. ताईस, सा.न.वि.वि. (अविवाहित असल्यास सौ. च्या जागी कु. लिहावे) | तुझा भाऊ /तुझी बहीण, |
| 9. | लहान बहीण | चि. हीस, अनेक शुभाशीर्वाद | तुझा भाऊ/ दादा /अण्णा, तुझी ताई /आक्का, |
| 10. | व्यवसायानिमित्त संबंध येणारी माननीय थोर व्यक्ती | माननीय श्री. यांना, सा.न.वि.वि. | आपला विश्वासू, आपली विश्वासू |

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

## काही अक्षरे व त्यांचा खुलासा

1) ती. - तीर्थरूप
2) ती. स्व. = तीर्थ स्वरूप
3) सौ. सौभाग्यवती
4) सा.न.वि.वि. साष्टांग नमस्कार विनंती
5) स. सप्रेम
6) श्री. = श्रीयुत, श्रीमती
7) ता.क. = ताजा कलम

## नियमित अभ्यासाचे महत्त्व पटवून देण्यासाठी धाकट्या भावाला पत्र लिहा -

॥ श्री ॥

**प्रेषक-**

प्रसाद जी.,
श्री समर्थ विद्यालय,
विद्यार्थी वसतिगृह, बेळगाव
पिन कोड 591237.

चि. वैजनाथला,

अनेक आशीर्वाद

कालच दादाचे पत्र मिळाले. त्यात तुझ्या परीक्षेचा निकाल वाचून अतिशय वाईट वाटले. वैजू, तुला सर्व विषयात कमी गुण मिळाले आहेत बघ, आणि इंग्रजी व गणित या विषयात तर तू नापासच झाला आहेस.

यावरून असे वाटते की, तू नियमित अभ्यास करत नाहीस. अरे, शिक्षणाशिवाय या जगात काहीच तरणोपाय नाही. तू चांगला अभ्यास करून गुण मिळविलेस तरच तुला पुढे फायदा होईल. आताच कष्ट घेतले तर पुढे सुख मिळेल. म्हणतात ना टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही.

असाच जर तू आळशी बनून दुर्लक्ष करशील तर तू वार्षिक परीक्षेत नापास होशील व सर्वजण हेटाळणी करतील. त्यामुळे घरच्या लोकांना किती वाईट वाटेल? विचार कर. अजून परीक्षेला वेळ आहे तोपर्यंत नियमित अभ्यास करून उत्तम गुण मिळवून वरच्या वर्गात जा. गेलेली वेळ पुन्हा येत नाही याची जाणीव ठेव.

अथर्वचा खटयाळपणा कमी झाला की नाही? कावेरी नियमित शाळेला येते ना? घरी ती सौ. आई, काकू, ती. काका यांना शि.सा. नमस्कार.

तुझा दादा,
प्रसाद

पत्ता -
वैजनाथ जी.,
'कृष्ण कुंज',
निपाणी, जि. बेळगावी.
पिन - 591215.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## शाळा सोडल्याचा दाखला मागणी करणारे पत्र मुख्याध्यापकांना लिहा.

दि - 10/06/2023

**प्रति,**

मा. मुख्याध्यापक,
अकोळ हायस्कूल
अकोळ,
ता- निपाणी, जि- बेळगाव.

**अर्जदार :** कुमारी आद्या गिरीश पुजारी

**विषय :** शाळा सोडल्याचा दाखला मिळणेबाबत.

**महोदय,**

वरील विषयास अनुसरून मी आद्या गिरीश पुजारी इयत्ता दहावीच्या वर्गात सन 2023-24 या शैक्षणिक वर्षात शिक्षण घेत होते. मार्च-2024 च्या परीक्षेत मी उत्तीर्ण झाले आहे. तरी मला पुढील शिक्षणासाठी शाळा सोडल्याच्या दाखल्याची आवश्यकता आहे. तरी लवकरात लवकर दाखला मिळावा ही विनंती.

कळावे,

आपली विश्वासू
आद्या

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## स्वाध्याय

1) घरी आई आजारी असल्यामुळे मी चार दिवस शाळेला येऊ शकत नाही तरी वर्ग शिक्षकांकडे रजेचा अर्ज करा.

2) ताईच्या लग्नासाठी दोन दिवसाची रजा मंजूर करणारे पत्र तुमच्या वर्ग शिक्षकांना लिहा.

# ई - मेल

संगणकाचा महिमा अगाध आहे. या संगणकाने संपूर्ण जगाला एकदम जवळ आणलंय. “ई-मेल हा आज परवलीचा शब्द झाला आहे. ई-मेल हे इंटरनेट नेटवर्क आणि इलेक्ट्रॉनिक डिव्हाइसद्वारे संदेश पाठविणे आणि प्राप्त करण्याचे एक डिजिटल साधन आहे. ई-मेल म्हणजे इलेक्ट्रॉनिक मेल. हा डिजिटल संदेशाचा एक प्रकार आहे जो वापरकर्ता दुसऱ्या वापरकर्त्याशी संवाद साधण्यासाठी वापरतो. ई-मेल हा कुटुंब आणि मित्रांच्या संपर्कात राहण्याचा एक मार्ग आहे. या ई-मेलमध्ये मजकूर, फोटो, बातम्या, फाइल्स किंवा कोणतेही संलग्न देखील असू शकतात, जे नेटवर्कद्वारे एखाद्या विशिष्ट व्यक्ती किंवा कोणत्याही व्यक्तींकडे पाठविले जाऊ शकतात.

यावर पत्र कसं पाठवायचं?" "पत्रासाठी 'ई-मेल' सेवा असते. ही सेवा देणाऱ्या अनेक खाजगी कंपन्या असतात. एखाद्या ठिकाणी आपले 'ई-मेल' खाते उघडायचे. त्या खात्याला तुम्ही एखाद्या सांकेतिक शब्द (पासवर्ड) द्यायचा. तो शब्द स्वतः शिवाय इतर कुणालाही माहित नसतो. तुम्हाला आलेली पत्र, काही संदेश तुमच्या खात्यात जमा होतात. ही पत्रे तुमच्या खात्याच्या सांकेतिक शब्दाच्या आधारे उघडून वाचू शकता. ज्यांच्याकडून ही पत्रे येतात, त्यात त्यांचा 'ई-मेल' चा पत्ता असतो, त्यावर तुम्ही पत्राचे उत्तर पाठवू शकता."

आपण तयार केल्याला ई-मेल आयडीमध्ये प्रामुख्याने तीन भाग असतात.

## 1. युजरनेम

ज्याला आपण वापरकर्ता नाव देखील म्हणतो.

ई-मेल आयडीच्या @ च्या आधी युजरनेम हा एक भाग असतो. हे ई-मेल खात्यात लॉग इन करण्यासाठी वापरले जाते आणि ही त्या व्यक्तीची ओळख असते जे ई-मेल पाठवते आणि प्राप्त करते.

## 2. डोमेन नेम

ई-मेल पत्त्यातील @ नंतरचा एक भाग म्हणजे डोमेन नेम. हे सर्व्हर चे नाव असते जेथून आपली माहिती इंटरनेटद्वारे एक्सचेंज केली जाते.

वर दर्शविलेल्या ई-मेल पत्त्यामध्ये, gmail.com हे एक डोमेन नाव आहे. ज्यामध्ये एक उच्च स्तरीय डोमेन देखील संलग्न आहे. येथे .com एक उच्च स्तरीय डोमेन आहे.

## 3. @ चिन्ह

@ या चिन्हाला “ॲट द रेट” म्हणतात. प्रत्येक ई-मेल मध्ये @ हे चिन्ह वापरलेले असते. या चिन्हाद्वारे ई-मेल वापरणाऱ्याचे नाव आणि ई-मेल सेवा देणाऱ्या वेबसाइट (डोमेन) चे नाव वेगळेवेगळे केले जाते. हा ई-मेल आयडीचा उपयुक्त भाग आहे.

ई-मेल लेखनाचे स्वरूप

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**From: प्रेषकचा ई-मेल पत्ता**

येथे आपल्या Email ID चा address असतो. म्हणजे आपल्या ई-मेल आयडीद्वारे समोरच्या व्यक्तीला मेल पाठवला जातो.

**To: प्राप्तकर्त्याचा ई-मेल पत्ता**

येथे आपल्याला ज्याला ई-मेल पाठवायचा आहे त्याचा ई-मेल पत्ता प्रविष्ट करावा लागतो. आपण एखाद्या कंपनीला ई-मेल करू इच्छित असल्यास आपल्याला कंपनीचा ई-मेल पत्ता टाकावा लागतो.

**Cc: कार्बन कॉपी**

जेव्हा आपल्याला एकच ई-मेल 2 किंवा अधिक ई-मेल पत्त्यांवर पाठवायचा असेल तेव्हा Cc वापरला जातो. म्हणजे आपण एकापेक्षा अधिक प्राप्तकर्त्यांना समान संदेश पाठविण्यासाठी Cc वापरू शकतो.

**Bcc: ब्लाइंड कार्बन कॉपी**

बीसीसी म्हणजे अंध कार्बन कॉपी. सीसी प्रमाणेच हे एकापेक्षा जास्त लोकांना मेल पाठविण्यासाठी देखील वापरले जाते. परंतु ई-मेलद्वारे Bcc, To आणि Cc मध्ये लिहिलेला ई-मेल पत्ता Bcc ई-मेल पत्ता पाहू शकत नाही.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

सोप्या भाषेत सांगायचे झाले तर Bcc हा ई-मेल च्या प्रती इतर लोकांना पाठविण्याचा एक मार्ग आहे. जेव्हा Cc वापरला जातो तेव्हा आपण प्राप्तकर्त्यांची यादी पाहू शकतो, परंतु Bcc मध्ये प्राप्तकर्त्यांची यादी पाहू शकत नाही, हा या दोघांमधील फरक आहे.

**Subject: आपला विषय येथे लिहायचा**

आपण ई-मेल का लिहित आहात, आपल्याला त्याचा विषय लिहावा लागेल. जेणेकरुन आपण ई-मेल का पाठविला हे प्राप्तकर्त्यास प्रथम समजते.

**Attach: या ऑप्शन द्वारे आपण पीडीएफ, इ-मेज यांसारख्या फाईल जोडू शकतो.**

**Compose:** कंपोज म्हणजे लिहिणे. आपल्याला एखाद्याला ई-मेल पाठवण्यासाठी Compose चा वापर होतो.

जर आपल्याला एखाद्याला ई-मेल पाठवायचा असेल तर आम्ही त्याबद्दल पूर्ण माहिती खाली दिली आहे. आपण ते पाहू शकता.

ई-मेल कसा लिहायचा?

आजच्या डिजिटल काळात ई-मेल लेखन खूप महत्त्वाचे झाले आहे. पत्राप्रमाणे आपण दोन प्रकारचे ई-मेल लेखन करू शकतो.

## 1. अनौपचारिक

औपचारिक पत्रांमध्ये मित्र, नातेवाईक, इ. समाविष्ट असतात.

उदाहरण 1: अनौपचारिक ई-मेल लिहिला आहे.

From: xyz@gms.com

To: cdf@abc.com

Cc / Bcc (आपल्याला आवश्यक असल्यास Cc आणि Bcc ओळ भरा)

विषय: घरी येण्याचे आमंत्रण

प्रिय मित्र वेदान्त

गेली काही वर्षे आपली भेट झाली नाही. येत्या 27 तारखेस माझ्या घरात कार्यक्रम आहे. म्हणून तुला हे कळविण्यात मला आनंद होतो की 27 डिसेंबर या दिवशी तुला येथे यायचे आहे. तू आल्याने आपण दोघे मिळून नंदगडला जाऊ. माझ्या घरचे देखील तुला भेटायला उत्सुक आहेत.म्हणून मी तुला आता खास आमंत्रण देत आहे की, तुला माझ्या घरी कार्यक्रमाला येणे आवश्यक आहे.

तुझा मित्र संजय

## 2. औपचारिक

औपचारिक पत्रांमध्ये कंपनीचे ई-मेल, शासकीय ई-मेल, बिझनेस साठीचे ई-मेल इ. समाविष्ट असतात.

उदाहरण 2: औपचारिक ई-मेल लिहिला आहे.

From: xyz@gms.com

To: cdf@abc.com

Cc / Bcc (आपल्याला आवश्यक असल्यास Cc आणि Bcc ओळ भरा)

विषय: गटार दुरुस्तीसाठी विनंती

मा. महोदय,

जयनगर परिसरात मुख्य गटार तुटल्याने नाल्याचे अस्वच्छ पाणी रस्त्यावर आले आहे. घाण पसरत आहे. म्हणून मी तुम्हाला विनंती करतो की कृपया या नाल्याची दुरुस्ती करावी.

मला आशा आहे की आपण ही दुरुस्ती लवकरात लवकर पूर्ण कराल.

आपला विश्वासू,

विजय

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# 3. प्रयोग

वाक्यात कर्त्याच्या किंवा कर्माच्या लिंग- वचन -पुरुषाप्रमाणे क्रियापदाची जी रचना किंवा योजना असते तिला व्याकरणात प्रयोग असे म्हणतात.

कर्ता - कर्म - क्रियापद यांच्या परस्पर संबंधाला प्रयोग असे म्हणतात.

वाक्यात कर्ता - कर्म व क्रियापद ही महत्त्वाची पदे असल्यामुळे कर्तरी प्रयोग, कर्मणी प्रयोग व भावे प्रयोग असे प्रयोगाचे मुख्य तीन प्रकार पडतात.

1] **कर्तरी प्रयोग :-** जेव्हा वाक्यातील क्रियापद हे कर्त्याच्या लिंग वचन व पुरुष यांच्याप्रमाणे बदलते तेव्हा 'कर्तरी प्रयोग' होतो.

उदाहरण :- 1) सुधीर गाणी ऐकतो.
2) सानिका गाणे ऐकते.
3) लोक गाणी ऐकतात.

वरील उदाहरणात वाक्यातील कर्ता बदलला तेव्हा क्रियापद बदललेले दिसून येते सुधीर कर्ता असताना क्रियापद ऐकतो आहे सानिका कर्ता असताना ऐकते क्रियापद झाले आहे तर लोक ते कर्ता असताना क्रियापद ऐकतात असे झाले आहे.

**कर्तरी प्रयोगाची वैशिष्टये**

1) कर्ता प्रथमा विभक्तीत असतो.

2) कर्म प्रथमान्त, किंवा द्वितीयांत असते.

2] **कर्मणी प्रयोग :-** जेव्हा वाक्यातील क्रियापद कर्माच्या लिंग, वचन व पुरुष याप्रमाणे बदलते तेव्हा 'कर्मणी प्रयोग' होतो.

कर्मणी प्रयोगातील वाक्यात कर्म हे असावेच लागते त्यामुळे या प्रयोगात कर्माला महत्व दिलेले दिसून येते.

कर्मणी प्रयोगाची वैशिष्टये

1) कर्ता तृतीया विभक्तीत असतो.

2) कर्मप्रथमा विभक्तीत असते.

**उदाहरण :-** 1) शशांकने आंबा खाल्ला.
2) शामलने आंबा खाल्ला.
3) शशांकने चिंच खाल्ली.
4) शामलने चिंच खाल्ली .

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

वरील उदाहरणात कर्म जेव्हा बदलले तेव्हा क्रियापद बदललेले दिसून येते. 'शशांक कर्ता, आंबा कर्म आहे तेव्हा खाल्ला हे क्रियापद झाले. शशांकच्या ऐवजी शामल हा स्त्रीलिंगी कर्ता घेतला परंतु क्रियापदात बदल झाला नाही. ज्यावेळी आंबा या कर्मा ऐवजी चिंच हे कर्म घेतले त्यावेळी मात्र क्रियापदात बदल झाला म्हणून यास ' कर्मणी प्रयोग 'म्हणावे.

**3] भावे प्रयोग :-** जेव्हा वाक्यातील क्रियापद हे त्यातील कर्त्याच्या किंवा कर्माच्या लिंग ,वचन व पुरुष यांच्याप्रमाणे बदलत नाही व ते नेहमी तृतीय पुरुषी नपुसकलिंगी व एक वचनी असते .ते नेहमी स्वतंत्र राहते तेव्हा 'भावे प्रयोग' होतो.

भावे प्रयोगाची वैशिष्ट्ये

1) कर्ता तृतीयांत असतो किंवा चतुर्थी विभक्तीतही असतो

2) कर्म असल्यास कर्माची सप्रत्यय द्वितीया विभक्ती असते.

**उदाहरण :-** 1) विनयने बैलास मारले .

2) वैशालीने बैलास मारले.

3) विनयने गाईस मारले.

4) वैशालीने गाईस मारले.

वरील उदाहरणात कर्ता बदलला परंतु क्रियापद बदलले नाही त्यानंतर कर्म ही बदलून पाहिले तरीही क्रियापदात बदल झाला नाही. क्रियापद हे चारही वाक्यात स्वतंत्र राहिले म्हणून हा ' भावे प्रयोग ' होय.

**खालील वाक्यातील प्रयोग ओळखा.**

1) राजाने राजवाडा बांधला.

2) दिनेश सुती कपडे वापरतो.

3) मुक्ता कादंबरी वाचते.

4) गवळ्याने गाईस बांधले.

5) राजाला मुकुट शोभतो.

6) अनिताने गोष्ट वाचली..

7) महेशने बैलाला पकडले.

8) मानसीने लाडू खाल्ला.

9) शिपायाने चोरास मारले.

10) सारंग भरभर चालतो.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# 4. समास

काटकसर करणे हा मनुष्याच्या अंगी असलेला एकूण गुण आहे. आपण दैनंदिन जीवनात बरीच काटकसर करतो. त्यामुळे आपण बोलतांना सुद्धा हा गुण वापरतो. आपण एखादे वाक्य पूर्ण न बोलता शब्दांची काटकसर करून एकच शब्द किंवा जोडशब्द तयार करतो. जो त्या वाक्यातील अर्थबोध करून देतो. यालाच 'समास' असे म्हणतात. अशी काटकसर करून जो शब्द तयार होतो त्यालाच सामासिक शब्द असे म्हणतात.

उदा.

वडापाव – वडाघालून तयार केलेला पाव.

पोळपाट – पोळी करण्यासाठी लागणारे पाट

कांदेपोहे – कांदे घालून तयार केलेले पोहे.

पंचवटी – पाच वडांचा समूह

**समासाचे मुख्य 4 प्रकार पडतात.**

1. अव्ययीभाव समास
2. तत्पुरुष समास
3. व्दंव्द समास
4. बहुव्रीही समास

### 1) अव्ययीभाव समास :

ज्या समासात पहिला शब्द मुख्य असतो व त्या तयार झालेल्या सामासिक शब्दांचा उपयोग क्रियाविशेषणासारखा केला जातो त्यास 'अव्ययीभाव समास' असे म्हणतात. अव्ययीभाव समासात आपल्याला खालील भाषेतील उदाहरणे पहावयास मिळतात.

**अ) मराठी भाषेतील शब्द**

उदा.

गावोगाव – प्रत्येक गावात

गल्लोगल्ली – प्रत्येक गल्लीत

दारोदारी – प्रत्येक दारी

घरोघरी – प्रत्येक घरी

मराठी भाषेतील व्दिरुक्ती (पहिल्या शब्दांचीच पुनरावृत्ती) होऊन तयार झालेले शब्द हे क्रियाविशेषणा प्रमाणे वापरले जातात म्हणून ही उदाहरणे अव्ययीभाव समासाची आहेत.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

### ब) संस्कृत भाषेतील शब्द

उदा.

प्रती (प्रत्येक) – प्रतिमास, प्रतिक्षण, प्रतिदिन

आ (पर्यत) – आमरण

आ (पासून) – आजन्म, आजीवन

यथा (प्रमाण) – यथाविधी, यथामती, यथाशक्ती.

वरील उदाहरणात प्रति, आ, यथा हे संस्कृत भाषेतील उपस्वर्ग लागून तयार झालेले शब्द आहेत. संस्कृत मधील उपस्वर्गांना अव्यय मानले जाते.

वरील उदाहरणामध्ये हे उपसर्ग प्रारंभी लागून सामासिक शब्द तयार झालेला आहे व ह्या उपसर्गांना सामासिक शब्दांत अधिक महत्त्व आहे.

### क) अरबी व फारसी भाषेतील शब्द

उदा.

दर (प्रत्येक) – दरसाल, दरडोई, दरमजल.

गैर (प्रत्येक) – गैरसमज, गैरहजर, गैरशिस्त

हर (प्रत्येक) – हररोज, हरहमेशा

बे (विरुद्ध) – बेकायदा, बेमालूम, बेलाशक, बेलाईक

वरील उदाहरणात संस्कृत भाषेमध्ये फारसी व अरबी भाषेतील उपसर्ग लागून मराठी भाषेत अव्ययीभाव समासाची उदाहरणे तयार झाली आहेत.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## 2) तत्पुरुष समास :

ज्या समासात दुसरे पद महत्वाचे असून समासाचा विग्रह करतांना गाळलेला शब्द, विभक्तीप्रत्यय लिहावा लागतो, त्यास तत्पुरुषसमास असे म्हणतात. थोडक्यात ज्या समासात दुसरा शब्द प्रधान / महत्वाचा असतो त्यास तत्पुरुष समास असे म्हणतात.

उदा.

महामानव – महान असलेला मानव

राजपुत्र – राजाचा पुत्र

तोंडपाठ – तोंडाने पाठ

गायरान – गाईसाठी रान

वनभोजन – वनातील भोजन

वरील उदाहरणांमध्ये पहिल्या पदापेक्षा दुसरे पद प्रधान आहे आणि या शब्दांना ला, चा, ने हे विभक्ती प्रत्यय वापरावे लागतात म्हणून त्यास तत्पुरुष समास असे म्हणतात.

### 3) व्दंव्द समास :

ज्या समासातील दोन्ही पद अर्थदृष्ट्या समान दर्जाचे असतात. त्यास 'व्दंव्द समास' असे म्हणतात. या समासातील पदे आणि, अथवा, व, किंवा या उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असतात.

उदा.

रामलक्ष्मण – राम आणि लक्ष्मण

विटीदांडू – विटी आणि दांडू

पापपुण्य – पाप आणि पुण्य

बहीणभाऊ – बहीण आणि भाऊ

आईवडील – आई आणि वडील

स्त्रीपुरुष – स्त्री आणि पुरुष

कृष्णार्जुन – कृष्ण आणि अर्जुन

ने-आण – ने आणि आण

दक्षिणोत्तर – दक्षिण आणि उत्तर

### 4) बहुव्रीही समास :

ज्या समासातील कोणतेच पद प्रमुख नसून त्या पदाच्या अर्थापेक्षा वेगळ्या अशा वस्तूंचा किंवा व्यक्तींचा त्यामधून बोध होतो त्या समासाला बहुव्रीही समास असे म्हणतात.

उदा.

नीलकंठ – ज्याचा कंठ निळा आहे असा (शंकर)

वक्रतुंड – ज्याचे तोंड वक्र आहे असा (गणपती)

दशमुख – ज्याला दहा तोंड आहे असा (रावण)

@KTBS NOT TO BE REPUBLISHED